जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# १४ लाख ८७ हजारांची जीएसटी न भरता पुरवठादाराने शासकीय कंत्राटदाराची व शासनाची केली फसवणूक

**तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल**

नगर - शासकीय कंत्राटदाराने खरेदी केलेल्या सिमेंटवर आकारण्यात येणारी जीएसटीची रक्कम कंत्राटदाराकडून घेवूनही ती शासनास न भरता शासनाची व कंत्राटदाराची १४ लाख ८७ हजार ६२४ रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात संबंधित पुरवठादारावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रोहन श्रीकांत मांडे (वय ४२, रा. साई कॉलनी, फुलारी मळा, सावेडी) यांनी फिर्याद दिली आहे. रोहन मांडे गेल्या १५ वर्षांपासून में. रोहन एस. मांडे इंजिनिअर्स अँनण्ड कॉन्ट्रॅक्टर्स या नावाने शासकीय बांधकाम व रस्ते विकासाची ठेकेदारी करतात. मार्च २०२४ मध्ये त्यांनी नागपूर येथील नीलेश आकरे याच्या में. आदित्य इंटरप्रायजेसकडून सिमेंट खरेदी केले. यासाठी आकरेने जीएसटीसह टॅक्स इनव्हॉइस दिले, ज्यावर मांडे यांनी ६८ लाख रुपये आरटीजीएसद्वारे वर्ग केले. मात्र, वित्त मंत्रालयाच्या सीजीएसटी विभागाच्या नोटीसमधून फसवणुकीचा खुलासा झाला.

नोटीसीनुसार, आदित्य इंटरप्रायजेसचा जीएसटी क्रमांक बंद असून, मांडे यांच्याकडून घेतलेली १४ लाख ८७ हजार ६२४ रुपयांची जीएसटी शासनाकडे जमा झालेली नाही. परिणामी, ही रक्कम दंडासह मांडे यांनाच भरावी लागणार आहे. यामुळे संतापलेल्या मांडे यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. त्यावरून में. आदित्य इंटरप्रायजेस या संस्थेने खोटे इनव्हॉइस देऊन शासनाची जीएसटी रक्कम बुडवल्याप्रकरणी नीलेश आकरे याच्याविरुद्ध तोफखाना पोलीस स्टेशनमध्ये २१ जूनला रात्री गुन्हा दाखल झाला आहे.

## प्रेरणादायी अक्षरधन...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन

संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१



### रंगात रंगुनी साऱ्या... सौंदर्याची उधळण

कोणत्याही रंग, रूप, सौंदर्यावर भाळणे हा मानवी स्वभाव आहे. आपल्या या भारतीय संस्कृतीत रंगाची इंद्रधनुषी उधळण दिसते. इतकेच काय अनेक देवांनासुद्धा रंगावरून नावं आहेत. उदा. रंगनाथ, सावळाराम, नीळकंठ, श्रीरंग इ.इ.

आसेतु हिमाचल असंख्य सौंदर्यात्सवाची मांदियळी आपल्याला लाभली आहे. ही जणू चित्रकलांची नैसर्गिक उधळणच. 'किती रंगविसी रंग । रंग भरले डोळ्यांत । माझ्यासाठी शिरीरंग । रंग खेळे आभाळात ।।'

आभाळात अन् गोकुळात रंग खेळणारा हरी थोरच!

लहानपणी रंगांचं वेड वेगळे व अवखळ असते. तेव्हा रंगबिरंगी वस्तूंचं भारीच आकर्षण असते. हळूहळू मोठं होताना प्रवास, निरीक्षण करतांना पान, फुलं, झाडं, सूर्योदय, पाऊस या नानाविध गोष्टींच्या रंगात रमायला होतं.

सूर्योदय, सूर्यास्ताचे अगणित रंग आवडत नाही असा रसिक भेटणं विरळाच. नदी वा सागराच्या पाण्यातले त्याचं प्रतिबिंब अवर्णनीयच.

उंच उंच पर्वते, नद्यांचे संगम, बांबूचा बहर, लांब लांब पसरलेली व बहरलेली शेती, फुलांचे ताटवे पाहणे जीवनाला सर्वोत्तम आनंद देते.

अनेक सारस्वतांना, साहित्यिक व जाणकार श्रोते, रसिकांना काव्य, संगीत, साहित्य, नाट्य अशा विविध कलांतून सौंदर्य जाणवते.

रोज वाटे एका फुले - कधी उडता येईल मला?
हवं तिथं जाता येईल - भारी भारी मज्जा होईल.
पाकळी पाकळी लागला पसरू - फुलच झाले फुलपा खरू
इकडून तिकडे उडत जाता - कोण त्याला अडविल आता?

इंद्रधनुषी रंग - सर्वदूर उधळणारे सौंदर्यात्सव पाहता आले, अनुभवता आले तर जीवनात येणारा आनंद निश्चितच द्विगुणित होता - जरूर अनुभव घ्या.



नाशिक जिल्ह्यातील रामशेज गडावर स्वच्छता, गडसंवर्धन तसेच वृक्षारोपण मोहिमेत खा. निलेश लंके यांच्या समवेत सहभागी झालेले प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खा. भास्कर भगरे, खा. राजाभाऊ वाजे आदी.

# भरपावसात खा. निलेश लंके यांची गडकिल्ले स्वच्छता व संवर्धन मोहीम

### प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खा.भास्कर भगरे, खा. राजाभाऊ वाजे यांचा सहभाग

नगर - खासदार निलेश लंके यांच्या आपला मावळा गडकिल्ले संवर्धन संघटनेमार्फत २२ जून रोजी नाशिक जिल्ह्यातील रामशेज गडावर स्वच्छता, गडसंवर्धन तसेच वृक्षारोपण करण्यात आले. या मोहिमेत राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार भास्कर भगरे, खासदार राजाभाऊ वाजे यांसमवेत हजारोच्या संख्येने इतिहास प्रेमी उपस्थित होते.

शिवाजी महाराजांच्या नावावर राज्यात राजकारण केले जाते, पण त्यांनी निर्माण केलेल्या गडांवर सरकारकडून दुर्लक्ष केले जाते अशी खंत जयंत पाटील यांनी बोलून दाखवली, लंके म्हणाले या मोहिमेत सामील होणारा प्रत्येक कार्यकर्ता हा मावळा आहे, कुणी खासदार नाही, कुणी छोटा नाही किंवा मोठा नाही. ही मोहीम या पुढील काळातही अविरत पणे सुरु राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

खा. निलेश लंके यांनी छत्रपती शिवरायांचा इतिहास जतन करण्याच्या हेतूने आपल्या वाढदिवसानिमित्त १० मार्च रोजी प्रत्येक महिन्याच्या एका रविवारी गड किल्ले संवर्धन मोहिम राबविण्याची घोषणा केली होती. या घोषणेनुसार मार्च महिन्यात किल्ले शिवनेरीपासून स्वच्छता मोहिमेस प्रारंभ करण्यात आला. एप्रिलमध्ये श्रीगोंदे तालुक्यातील धर्मवीरगड तर मे महिन्यात भोर जिल्हा पुणे येथील रायरेश्वर गडावर येथे स्वच्छता मोहिम राबविण्यात आली होती.

खा. लंके यांच्यासमवेत त्यांच्या म ावळा संघटना तसेच नीलेश लंके प्रतिष्ठानचे शेकडो कार्यकर्ते या मोहिमेत सहभागी होतात. खा. लंके यांच्या कार्यकर्त्यांव्यतिरिक्त स्थानिक शिवप्रेमीही या मोहिमेत सहभागी होत आहेत. स्थानिक शिवप्रेमींचा सहभाग प्रत्येक किल्लूयाच्या मोहिमेमध्ये वाढताना दिसत आहे.

# नागापूर परिसरात रात्रीच्या वेळी संशयितरित्या फिरणाऱ्यास पकडले

नगर - रात्रीच्या वेळी अंधाराचा गैरफायदा घेऊन काहीतरी गैरकृत्य करण्याच्या हेतूने स्वतःचे अस्तित्व लपवून संशयितरित्या वावरणाऱ्या संशयितांच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. ही कारवाई एमआयडीसी पोलिसांनी नागापूर हद्दीतील सेंट मेरी चर्च जवळ २२ जून रोजी रात्री १२.३० वाजता केली.

या बाबतची माहिती अशी की एमआयडीसी पोलीस रात्री पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना नागापूर येथील सेंट मेरी चर्च जवळ एका टपरीच्या आडोशाला अंधारात दबा धरुन बसलेल्या गणेश सोन्याबापू कदम (वय १९ रा, नागापूर, अ.नगर) यास पकडले. त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. पोलिसांनी त्यास ताब्यात घेतले.

या प्रकरणी पो. कॉ. भगवान वंजारी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन गणेश कदम याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १२२ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार संदिप पितळे हे करीत आहेत.

# रात्रीच्या वेळी चोरीच्या उद्देशाने फिरणाऱ्या एकास पकडले

नगर - रात्रीच्या वेळी अंधाराचा फायदा घेऊन, तोंडाला रुमाल बांधून स्वतः चे अस्तित्व लपवून चोरी करण्याच्या उद्देशाने दबा धरुन संशयितरित्या वावरणाऱ्या एकास नगर तालुका पोलिसांनी पकडले. ही कारवाई २१ जून रोजी मध्यरात्री १२.३० च्या सुमारास नगर पुणे रोडवरील चास (ता.नगर) येथे करण्यात आली. या कारवाईत पोलिसांनी अशोक मुरलीधर अडबल्ले (वय ३२, रा. दौलावडगाव, ता.आष्टी जि. बीड) यास ताब्यात घेऊन त्याच्याकडे रात्री फिरण्याचे कारण विचारले असता त्याने उडवाउडवीचे उत्तरे देऊन समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. यावरुन पोलिसांनी त्यास ताब्यात घेतले. या प्रकरणी पो. कॉ. कमलेश पाथरुट यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अशोक अडबल्ले याच्या विरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस हवालदार जे.डी जंबे हे करीत आहेत.

## बाबासाहेब पटवेकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर - माळीवाडा पारगल्ली येथील रहिवासी बाबासाहेब शंकरराव पटवेकर (वय ५३) यांचे २२ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, भाऊ, पत्नी, मुलगा, मुलगी असा परिवार आहे.

## पारुबाई औसरकर यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - पारुबाई त्र्यंबकराव औसरकर (वय ९६) यांचे २१ जून रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार आहे. रमेश औसरकर यांच्या त्या मातोश्री होत.

# नगर-जामखेड रोडवर बसचालक आणि वाहकास मारहाण; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर - गाडीला कट का मारला अशी विचारणा करुन दोघांनी बसचालक व वाहकास शिवीगाळ दमदाटी करीत मारहाण केली. ही घटना निंबोडी शिवारामधील आर्मी एरियातील जुन्या जकात नाक्याच्या समोरील स्पीड ब्रेकर जवळ २२ जून रोजी सकाळी १०.३० वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत बस चालक जालिंदर विठ्ठल खाडे (वय. ३७, रा. सिद्धिविनायक मंगल कार्यालय जवळ, तिसगाव, ता. पाथर्डी. मूळ रा. मोहोज ता. पाथर्डी) यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी व वाहक आदिनाथ डोईफोडे असे दोघे एसटी बस (क्र. एम एच २० बी एल २४७९) ने प्रवासी घेऊन पाटोदा येथून जामखेड मार्गे अहिल्यानगर कडे येत असताना निंबोडी शिवारातील आर्मी एरियामध्ये जुन्या जकात नाक्याचे समोरील स्पीड ब्रेकर जवळ दोघांनी हात दाखवून एसटी बस थांबवली. त्यानंतर आमच्या गाडीला कट का मारला अशी विचारणा करुन शिवीगाळ केली.

यावेळी फिर्यादी हे त्यांना समजून सांगत असताना त्यांनी काही एक न ऐकता फिर्यादीस मारण्याची धमकी देत मारहाण केली. यावेळी बसवाहक आदिनाथ डोईफोडे यांनी मध्यस्थी करुन त्यांना समजावून सांगितले असता वाहक डोईफोडे यांचे न ऐकता दोघांनी फिर्यादीस शिवीगाळ दमदाटी करीत ते करत असलेल्या सरकारी कामात अडथळा आणला. यावेळी झालेल्या झटापटीत वाहक डोईफोडे यांचा खिसा फाटून खिशातील १ हजार ९७५ रुपये कोठेतरी पडून गहाळ झाले. या मारहाणीत फिर्यादी हे जखमी झाले मारहाण करणाऱ्या त्या दोघांची नावे महेश राजेंद्र पवार आणि वैभव साहेबराव पवार (दोघे रा. टाकळी काझी, ता. नगर) असे असल्याचे समजले.

याप्रकरणी जालिंदर खाडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात महेश पवार व वैभव पवार यांच्याविरुद्ध बी एन एस कलम १३२,११५ (२) ३५२, ३२४(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास महिला पोलीस हवालदार जे एस फुंदे या करीत आहेत.

## भिमाबाई ठोकळ यांचे अल्प आजाराने निधन

नगर - कामरगाव येथील रहिवासी भिमाबाई अशोक ठोकळ (वय ९०) यांचे २१ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर कामरगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. माजी सरपंच अशोक ठोकळ यांच्या त्या पत्नी होत.



त्यांच्या मागे पती, २ मुले, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सचिन ठोकळ, संतोष ठोकळ यांच्या त्या मातोश्री होत.

## बाजीराव दांडेकर यांचे अपघाती निधन

नगर - श्रीगोंदा तालुक्यातील घायपतवाडी येथील रहिवासी बाजीराव लक्ष्मण दांडेकर (वय ६५) यांना चार चाकी गाडीने धडक दिल्याने त्यांचे १७ जून रोजी अपघाती निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर श्रीगोंदा येथील सिद्धेश्वर घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, भाऊजय, दोन मुले, पुतणे, नात, नातू असा परिवार आहे

## निलकंठ क्षीरसागर यांचे हृदयविकाराने निधन

श्रीरामपूर - येथील रेल्वे स्टेशन समोरील हॉटेल निलकंठचे मालक निलकंठ मुरलीधर क्षीरसागर (वय ५२) यांचे पुणे येथील सह्याद्री हॉस्पिटल येथे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, भाऊ, मुलगा, बहिणी, सून, पुतणे असा परिवार आहे. बुवा हलवाई हॉटेलचे मालक दत्तात्रय क्षीरसागर यांचे धाकटे बंधू, कुणाल क्षीरसागर यांचे वडील होत.



## सौ.मीनाक्षी कुलकर्णी (नेवपुरकर) यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर - पारगावकरनगर येथील रहिवासी सौ. मीनाक्षी संजय कुलकर्णी (नेवपुरकर) (वय ५८) यांचे १९ जुन रोजी निधन झाले. त्यांच्यावर एन-६ येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, मुलगी जावई, नातू असा परिवार आहे.

## उड्डाणपुलावर अपघात; नमोह लोढा याचे निधन

नगर - क्लासला जात असताना इम्पिरियल चौकात उड्डाणपुलावर अपघात होवून जखमी झालेल्या नमोह धनेश लोढा (वय १६, रा. माणिकनगर, अ.नगर) याचे २३ जून रोजी सकाळी १०.४३ च्या सुमारास उपचारादरम्यान निधन झाले आहे.



नमोह हा १० वी मध्ये शिक्षण घेत होता. २१ जून रोजी दुपारी १.३० च्या सुमारास तो क्लासला जात असताना उड्डाणपुलावर इम्पिरियल चौकाजवळ एका वाहनाने त्यास धडक दिल्याने तो गंभीर जखमी झाला होता. त्याला तातडीने उपचारासाठी नगर कॉलेज जवळील एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. तेथे उपचार सुरु असताना २३ जून रोजी सकाळी त्याचा मृत्यू झाला आहे. याबाबत कोतवाली पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मयत नमोह याच्या पश्चात आई, वडील, भाऊ, चुलते, चुलती, चुलत भाऊ असा परिवार आहे. डॉ. अशोक, प्रकाश, सुरेश, मदनलाल लोढा (हिंगणगाववाला) यांचा तो नातू होत.

## रविंद्र खरपे यांचे हृदयविकाराने निधन



भिंगार - लोहारगल्ली येथील रहिवासी रविंद्र गेनप्पा खरपे (वय ६९) यांचे २१ जून रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, जावई असा परिवार आहे. राहुल खरपे यांचे ते वडील होत.

## आसाराम जगदाळे यांचे अल्प आजाराने निधन

नगर - पुणे येथील आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते राजेंद्रनगर केडगाव येथील आसाराम रंगनाथ क्षीरसागर (सर) (वय ८५) यांचे २१ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर केडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ३ भाऊ, ५ बहिणी, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. क्रीडा शिक्षक संभाजी जगदाळे यांचे ते वडील होत.



श्री भैरवनाथ जनसेवा विद्यालयामध्ये सेवा करताना अनेक क्रीडा पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले व भारत स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना त्यांनी जागतिक पातळीवरील यश मिळवून दिले.

# विनापरवाना स्फोटक पदार्थांनी वाहतूक करणारी २ वाहने पकडली

**निंबळक बायपास वरील कारवाई, ३२ लाखांचा मुद्देमाला केला जप्त**



विनापरवाना स्फोटक पदार्थांनी वाहतूक करणारी २ वाहने पकडल्या नंतर आरोपींच्या समवेत एमआयडीसी पोलीसांचे पथक.

नगर - विना परवाना स्फोटक फटाक्यांची वाहतूक करणारा कंटेनर व टेम्पो एमआयडीसी पोलिसांनी पकडला आहे. निंबळक बायपास रस्त्यावरील लामखेडे पेट्रोल पंपाजवळ २१ जून रोजी सायंकाळी ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत पोलिसांनी ३२ लाख ६ हजार ३४३ किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

निंबळक बायपास रस्त्यावरील लामखेडे पेट्रोल पंपाजवळ एका कंटेनरमधून (क्र. टी.एन. २९ सी.यु. १२६६) एक इसम फटाक्यांची विनापरवाना वाहतूक करत आहे, अशी माहिती सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांना मिळाली होती. त्यांनी तात्काळ एक पथक तयार करून सापळा रचत तेथे छापा टाकला असता, टेम्पो (क्र.एमएच १६ सीडी ५७९२) मध्ये कंटेनरमधून फटाके उतरत असल्याचे दिसून आले.

सदर कंटेनरमधून मिळालेल्या स्फोटक फटाक्यांची चौकशी केली असता चालक सुरेशकुमार वेलस्वामी (वय ३५, रा. पारामती वेल्लुर, तामिळनाडू) याच्याकडे कोणतीही अधिकृत परवानगी किंवा कागदपत्रे नसल्याचे स्पष्ट झाले. त्याच्यासोबत किरण संजय खामकर (रा. इसळक, ता. नगर) याचा सहभागही निष्पन्न झाला आहे. या दोघांकडून कंटेनर, टेम्पो व स्फोटक पदार्थ असा एकुण ३२ लाख ६ हजार ३४३ रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर घटनेतील संशयित आरोपींविरोधात विनापरवाना फटाके बाळगणे, वाहतूक करणे आणि सार्वजनिक ठिकाणी इतरांच्या जिवाला धोका पोहोचेल अशा विविध कलमान्वये एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी (नगर ग्रामीण) अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक माणिक चौधरी, उपनिरीक्षक विनोद परदेशी व मनोज मोंढे, अंमलदार खेडकर, पितळे, सचिन आडबल, राजू सुद्रीक, किशोर जाधव, मोबाईल सेलचे राहुल गुंडु यांच्या पथकाने केली.

# क्रिकेट खेळण्याच्या वादातून दोघांना धारदार वस्तूने मारहाण

नगर - क्रिकेट खेळण्याच्या वादातून झालेल्या भांडणाचा राग मनात धरुन दोघांवर काहीतरी धारदार वस्तूने वार करुन मारहाण केल्याची घटना बाराबाभळी जवळील यशवंतनगर डेअरी फार्म येथील हनुमान मंदिराजवळ २२ जून रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत आशिष बाळासाहेब गायकवाड (वय २०,रा. हनुमान मंदिराजवळ यशवंतनगर, डेअरी फार्म, ता. नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की फिर्यादी यांच्या घराजवळ क्रिकेट खेळण्याच्या कारणावरुन आदेश सिकंद वाघमारे (रा. हनुमान मंदिराजवळ, यशवंतनगर डेअरी फार्म) याने वाद घालून भांडण केले. या वादाचा राग धरुन त्याने फिर्यादी व त्यांचा मित्र अंकुश सुभाष गवळी यांना शिवीगाळ दमदाटी करीत काहीतरी धारदार वस्तूने डोक्यात व डाव्या हाताच्या खांद्यावर मारहाण करुन जखमी केले. तसेच लाथाबुक्क्यानी मारहाण करुन ठार मारण्याची धमकी दिली. या मारहाणीत फिर्यादी व त्यांचा मित्र अंकुश गवळी हे जखमी झाले.

याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात आशिष गायकवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आदेश वाघमारे यांच्याविरुद्ध बी एन एस ११८ (१),११५ (२), ३५१ (२) (३), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल केला पुढील तपास पोलिस हवालदार जी डी गोल्हार हे करीत आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### व्यायाम करताना...

कसरत करताना पाणी पिणे हे व्यायाम करण्या इतकेच महत्त्वाचे आहे. व्यायामादरम्यान शरीराला घाम येतो, ज्यामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होते. जर हे पाणी नुकसान भरून काढले नाही तर त्यामुळे निर्जलीकरण होऊ शकते, ज्याचे अनेक तोटे आहेत. पाणी शरीर थंड ठेवण्यास मदत करते, ज्यामुळे व्यायाम करणे सोपे होते. पाणी स्नायू निरोगी ठेवण्यास मदत करते आणि स्नायूंमध्ये येणारे पेटके टाळते. निरोगी ठेवण्यास मदत करते आणि सांधेदुखी टाळते. त्याचप्रमाणे पाणी पचनसंस्था सुधारण्यास मदत करते. पाणी मेंदू निरोगी ठेवण्यास मदत करते आणि मन तीक्ष्ण ठेवते. व्यायामा दरम्यान किती पाणी प्यावे हे व्यायामाची तीव्रता, हवामान आणि शरीराचे वजन यासारख्या अनेक घटकांवर अवलंबून असते. परंतु सामान्य नियमानुसार, व्यायामापूर्वी ५०० मिली आणि व्यायामादरम्यान दर १५-२० मिनिटांनी २५०मिली पाणी प्यावे. व्यायामानंतरही ५०० मिली पाणी प्यावे.

## पाककला

### मुग वडे

**साहित्य :** १ मोठी वाटी पिवळी मुग डाळ, ४-५ हिरव्या मिरच्या, मुठभर कोथिंबीर बारीक चिरून, १/२ टिस्पून धणे, जीरे, चिमूटभर हिंग, मीठ, तेल गरजेनुसार, १/२ टिस्पून ईनो, ५-६ पाने कढिपत्ता,

**कृती :** मुग डाळ ४-५ तास भिजवून ठेवा. ती उपसून मिरच्या, धणे, जीरे कढीपत्ता यासोबत जाडसर वाटून घ्या. एका वाडग्यात काढून त्यात मीठ, कोथिंबीर, १/२ टिस्पून ईनो घालून फेटून घ्या. कढईत तेल तापवून त्यात छोटे छोटे पकोडे करून घाला. खमंग तळून मिरची सोबत सर्व्ह करा.

## वास्तू

### घरात कोणती तुळळ लावावी?

❋ ज्योतिष शास्त्रानुसार तुम्ही घरात कोणतीही तुळशी लावू शकता. तुळशीची लागवड करून तुम्ही राम किंवा श्यामा यांची पूजा करू शकता. तुम्हाला हवे असल्यास तुळशीचे दोन्ही प्रकार लावू शकता. पण, पूजेच्या दृष्टिकोनातून रामा तुळशीचे महत्त्व अधिक असल्याचे सांगितले जाते.

❋ तुळशीच्या रोपामध्ये माता लक्ष्मीचा वास असतो. घराच्या उत्तर दिशेला तुळशीचे रोप लावणे सर्वात शुभ असते असे मानले जाते. तुळशीचे रोप लावल्याने घरात सुख-समृद्धी वाढते.

## सल्ला

बाथरुमच्या टाइल्सवर पाणी आणि धुळीमुळे खूप घाण जमा होते. जर टाइल्स पांढऱ्या असतील तर त्या काही वेळातच पिवळ्या होऊ लागतात. ते साफ करण्यासाठी एक शक्तिशाली क्लिनर आवश्यक आहे. अशा वेळी, कपडे धुतल्यानंतर उरलेले सर्फ बाथरूम टॉयलेट साफ करण्यासाठी खूप प्रभावी ठरते.

## सौंदर्य

सतत चेहऱ्याला हात लावू नये. कारण हाताला असलेले बॅक्टेरिया चेहऱ्याला लागतात. त्यामुळे चेहऱ्यावर पिंपल्स येतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

मंगळवार, दि. २४ जून २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, ज्येष्ठ कृष्णपक्ष, रोहिणी १२।५४, सूर्योदय ०६ वा. ३३ मि. सूर्यास्त ०५ वा. ४० मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आर्थिकदृष्ट्या दुहेरी लाभ होईल. राजकीय क्षेत्रातील जबाबदारी पार पाडाल. कुटुंबाची साथ राहील. व्यवसायात भागीदारी करावयास हरकत नाही.

**वृषभ :** जोडीदार आनंदी असेल. शेजाऱ्यांना मदत कराल. मानसिक तणाव कमी होईल. नियोजन यशस्वी होईल. धार्मिक कार्याची आवड राहील.

**मिथुन :** सध्या कामाचे नियोजन अगदी वेळेत होणार आहे, पण कोणते काम आधी करू, कोणते नंतर करू ही वृत्ती आड येवू शकते. भावंडाशी संपर्क साधाल. प्रकृती ठीक राहील.

**कर्क :** एका मतावर ठाम राहाल, त्यामुळे निर्णय यशस्वी होतील. व्यवसायातून मिळणारे उत्पन्न चांगले असेल. तरुण वर्गाला विवाहाचे प्रस्ताव येतील.

**सिंह :** नोकरदार वर्गाला कामाच्या संदर्भात ठोस उपाययोजना करावी लागेल. आर्थिकदृष्ट्या खर्च कमी करा. कौटुंबिक मतभेद दूर होतील. राजकीय क्षेत्रातील घडामोडींचा अंदाज येईल.

**कन्या :** तडजोडीतून यश मिळेल. बऱ्याच कालावधीमध्ये थांबलेल्या कामांना गती येईल. आर्थिक बाबतीत मात्र काटकसर कराल. नोकरदार वरिष्ठांचा त्रास होईल.

**तूळ :** आर्थिकदृष्ट्या सतर्क राहाल. समाजमाध्यमांचा वापर जेवढ्यास तेवढा करा. कामापुरते जवळ करणाऱ्या मैत्रीपासून लांब राहा.

**वृश्चिक :** कामाचे नियोजन जरी केले तरी त्या कामांमध्ये तांत्रिक अडचणी येऊ शकतात, तेव्हा काम उशिरा होणार आहे हे गृहीत धरून चालावे.

**धनु :** व्यवसायातील परिस्थिती चांगली असेल. नोकरदार वर्गाला काम मिळत नाही. केले तर वरिष्ठांचे बोलणे खावे लागेल. बाकी दिवसांचा कालावधी चांगला असेल.


**मकर :** आपले काम भले आणि आपण भले हे सूत्र लक्षात ठेवा. समोरच्याशी बोलताना शब्द जपून वापरा. म्हणजे गोष्टी अंगलट येणार नाहीत.

**कुंभ :** या दिवसात कामात गुंतून राहा. नवीन काही खरेदी करू नका किंवा कुणाला शब्द देऊ नका. बाकी दिवसांचा कालावधी चांगला आहे. आळस बाजूला साराल. करमणूक होईल.

**मीन :** आर्थिकदृष्ट्या वायफळ खर्च होईल. राजकीय क्षेत्रात तणावाचे वातावरण निर्माण होईल. मित्र-मैत्रिणींशी संपर्क साधाल. वरिष्ठांची मर्जी राहिल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**


## शब्दगंध क्र. ७२०५ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) भव; संसार ४) जिल्ह्याचे ठिकाण असलेले गुजरातमधील एक शहर ७) वसुधा; रसा; अवनी; पृथ्वी ९) लोकनाट्य तमाशातील एक भाग १०) जमीन मोजण्याचे एक माप ११) वाकलेला; झुकलेला १३) पाण्याचा बारीक प्रवाह; हत्याराची कापण्याची बाजू १४) नाद; आवाज; ध्वनी १५) इराणची राजधानी १७) पखरण; अंगणात केलेले शेणाच्या पाण्याचे सिंचन २०) आजूबाजूला; परिसरात २२) टापटीप; साफसूफ; चकपक २४) रामायणातील किष्किंधा नगरीचा वानरराज २५) एक पक्षी; कावळा; काग २६) अट; पैज

**उभे शब्द :-** २) पंधरा दिवसांचा समूह; पक्ष ३) चल; जंगम; खंदक; हाळ ५) सावध रहा; खबरदार ६) उतरण; ढाळ; कडपा; टेकडी ८) वाताहत; बोजवारा १०) पांढरे चकचकीत; संगमरवरी १२) समेट; सलोखा; साम १६) देवांचे शत्रू; असुर; दानव १८) कृष्णाने गोपींबरोबर केलेली क्रीडा १९) एकापेक्षा जास्त २०) अंबर; नभ; गगन २१) मुरली; बासरी २३) बांगला देशचे चलन

### शब्दगंध क्र. ७२०४ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** आयुष्यात आपल्याला जे चांगले मिळाले आहे ते दुसऱ्यालाही मिळावं हा विचार ज्यावेळी आपल्या मनात जन्म घेतो तेव्हापासून आपला प्रवास निरपेक्ष माणुसकीच्या आणि आपुलकीच्या दिशेने सुरू होतो.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### चार्जर लावून ठेवल्यास वीज बील वाढते का?

मोबाईल ही हौस राहिली नसून गरजेची गोष्ट झाली आहे. अनेक गोष्टी मोबाईलच्या माध्यमातून होतात. ऑफिस असो, शॉपिंग असो किंवा आर्थिक व्यवहार असो सर्व गोष्टी आज मोबाईलच्या माध्यमातून होतात.

सामान्यपणे फोन चार्ज होताना चार्जर पाच ते २० व्हॅट वीज वापरतो. हा वापर फोन आणि चार्जरच्या क्षमतेवर अवलंबून असतो. अनेकदा लोक मोबाईल चार्ज करून चार्जर तसाच ठेवतात नुसता चार्जर सॉकेटला लावून ठेवला असेल आणि मोबाईल चार्ज होत नसेल तरी वीज वापरली जाते.

अनेक हायस्पीड चार्जर सॉकेटला कनेक्ट केल्यानंतर लगेच वीज खेचून घेतात. त्यामुळेच नुसता चार्जर सॉकेटला लटवणं हे मोबाईल चार्ज करण्यासारखं आहे. त्यासाठी तितकीच वीज खर्च होते. म्हणजेच मोबाईल चार्ज होताना जेवढी वीज खर्च होते तेवढीच सॉकेटला मोबाईल नुसता लावून ठेवल्यासही खर्चली जाते.

### रावणकथा

धोब्याच्या वचनानुसार श्रीरामांनी सीतेचा त्याग केला. ते एकटेच पृथ्वीचे राज्य करु लागले. एकदा श्रेष्ठ मुनी अगस्ती राजसभेत आले असता श्रीरामांनी त्यांना विचारले, देवांना पीडा देणारा लंकापती रावण ज्याला मी मारले तो व त्याचे भाऊ कुंभकर्ण, तसेच इतर बांधव हे खरे होते तरी कोण? यावर अगस्ती म्हणाले, राजा, सर्व जगाची निर्मिती करणारा ब्रह्मदेव याच्या मुलाचा मुलगा विश्रवा हा वेदशास्त्रसंपन्न होता. त्याला मंदाकिनी व कैकसी नावाच्या दोन पत्नी होत्या. त्यापैकी मंदाकिनीने कुबेराला जन्म दिला. त्याने शंकराची आराधना करून लोकपालपद मिळवले. कैकसी ही दैत्यकन्या असून तिने रावण, कुंभकर्ण व बिभीषण यांना जन्म दिला. यातील बिभीषण हा सदाचरणी असून रावण व कुंभकर्ण अधार्मिक वृत्तीचे बनले. एकदा कुबेर पुष्पक विमानात बसून मातापित्यांच्या दर्शनासाठी ते राहत होते त्या आश्रमात गेला. दोन्ही मातांना मोठ्या नम्र भावाने त्याने वंदन केले. यानंतर कैकसी रावणास म्हणाली, बघ, याच्यापासून काही शीक. शंकरांची तपस्या करून त्याने लंकेचा निवास, हे विमान, राज्य, धन प्राप्त करून घेतले.

यावर रावण म्हणाला, यात काय विशेष? मी तपस्या करून त्रैलोक्याचे राज्य संपादन करीन. मग रावण, बिभीषण व कुंभकर्ण यांनी पर्वतावर जाऊन उग्र तप केले.

ब्रह्मदेवांनी प्रसन्न होऊन रावणास फार मोठे राज्य दिले. मग रावणाने कुबेराचे राज्य, विमान बळकावले. त्याने ऋषीमुनी, देव यांनाही त्रास दिला. सर्व देव ब्रह्मदेव शंकरांना घेऊन भगवान विष्णूकडे गेले. आपण अयोध्येचा राजा दशरथ याच्या पोटी अवतार घेऊन रावणाचा वध करू, असे आश्वासन त्यांनी दिले. त्यानुसार सारे घडले. आपण मानवदेहधारी भगवान असून लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न आपलेच अंश आहेत.

## जीवन का अमृत (भाग १)



### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

जब हमें कुछ देना होता है, तो यह हमेशा अच्छा रहता है कि हम उसे देकर मुक्त हो जाएँ। जो रास्ता सतुगुरु बताते हैं, वह दो तरफा असर करता है। एक तो इससे आंतरिक उन्नति होती है, जिससे नम्रता और सहनशीलता बढ़ती है, ताकि जिंदगी के उतार-चढ़ाव का सामना बिना विचलित हुए किया जा सके, और दूसरे, इन मुसीबतों की तीव्रता और अवधि बहुत कम हो जाती है।

इसलिए हमें ऐसी जिंदगी जीनी चाहिए, जैसी सतुगुरु हमें बताते हैं और अपने भजन- अभ्यास को नियमित रूप से तथा प्रेम, विश्वास और भक्ति के साथ करना चाहिए। अगर हमें किसी से प्रभावित होना है, तो हम दूसरों के सदगुणों से प्रभावित हों, किसी और वस्तु से नहीं।

विवाहित जीवन रूहानियत में निषेध नहीं हैं, अगर धर्म-ग्रंथों में बताए गए नैतिकता के नियमों के अनुसार जीया जाए। पवित्र जिंदगी जीने से पति और पत्नी, दोनों को स्वास्थ्य, शक्ति और स्फूर्ति मिलती है। गुरु-शक्ति सदा आपके साथ है, आपके सिर पर कार्यरत और आपको हर संभव प्रेम और सरंक्षण प्रदान करती हुई। एक दयालु पिता यह नही चाहेगा कि उसके बच्चे सदा के लिए पालने में पड़े रहें, बल्कि वह चाहेगा कि बच्चे खड़े हों और चलें। पिता अवश्य ही बच्चे को खड़ा होने और चलने में मदद देने के लिए अपना हाथ आगे बढ़ाएगा। मेरा प्यार आपके साथ है, निश्चित रहो ।

शिष्य अपनी ईमानदारी, सच्चाई, पवित्रता और सतुगुरु के प्रति भक्ति के अनुपात में ही अपने परम लक्ष्य तक पहुँचता है।

यदि आप आध्यात्मिक मुक्ति चाहते है तो अपने आपको सुधारने में एक क्षण भी न गँवाओ यही काम आपके सामने है। सतुगुरु के प्रति अपने प्रेम को पूर्ण बनाओ और उसकी आज्ञा पालन में अटल रहो। उसके उद्देश्य के लिए, अपनी क्षमता अनुसार अच्छे से अच्छा करो, पर अपने सीमित दृष्टिकोण की वजह से, अपने अंदर अपने साथियों या दोस्तों के प्रति विरोध या घृणा न पैदा होने दो।

जब तक हम ब्रह्मांडीय चेतनता नहीं पाते, हमारे विचारों में अंतर होना स्वाभाविक है। पर अगर हम इस अंतर का कारण ठीक से समझ लें तो हम उनकी वजह से अपने मन की शांति को भंग नहीं होने देंगे। कैसा भी बाहरी विरोध हो, हमारे बारे में लोगों का कैसा भी ख्याल हो, पर अगर हम पूर्ण रूप से सतुगुरु के प्रेम में समर्पित रहें, तो कुछ भी हमारे मन के संतुलन को खराब नहीं कर सकता और हमारी आध्यात्मिक उन्नति में बाधा नहीं बन सकता।

जो कोई दूसरों के विचारों से बेचैन हो जाता है, वह बिना किसी शक के, अभी भी अपने अहंकार के वश में है और उसे अभी अपने अहम् पर विजय पानी है।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### आज्ञा चक्र

आंखो को पढ़ो तो उसका दिमाग पढ़ा जाता है। किसी मनुष्य के बारे गहरी जानकारी लेनी हो तो उसका सिर्फ चेहरा और चेहरे में भी सिर्फ आंखे भर देखनी हैं। व्यक्ति का मुख और आंखे उसके अवचेतन मन को दर्शाते हैं। यह अवचेतन मन का दर्पण है और दर्पण में सब दिखता है। मनुष्य मन हर घड़ी पैंतरे बदलता है। यह बदलाहट पहले आंखो में दिखाई देती है। जब हम किसी को देखते हैं तो संकल्प प्रकाश का रुप धारण कर लेते हैं और उस व्यक्ति को प्रभावित कर हैं तथा दूसरा व्यक्ति जब हमें देखता है तो उनकी आंखो से निकला हुआ प्रकाश हमें प्रभावित करता है अर्थात हम एक दूसरे के प्रति क्या सोच रहे हैं बह महसूस करते हैं। अगर गलत सोचते हैं तो एक दूसरे की शक्ति नष्ट करते हैं यदि अच्छा सोचते हैं तो एक दूसरे की शक्ति बढ़ती है। हम सारे दिन में भिन्न भिन्न काम करते हैं, काम करवाते हैं, मुख से अपने विचार दूसरे को बताते हैं और कानों द्वारा सुनते हैं। वास्तव में यह सब करते हुये अपने विचार आंखो द्वारा भी भेज रहे होते हैं। यही कारण है जब हमारे मन में खोट होता है तो दूसरो से आंख छिपा कर बात करते हैं। स्थूल आंखे कुछ दूरी तक देख सकती हैं। दूरबीन से और ज्यादा दूर देख सकती हैं। सूक्ष्म लोक में क्या हो रहा है यह नहीं देख सकते। दूसरे कमरे में क्या हो रहा है, शहर के दूसरे कोने में क्या हो रहा है, नहीं देख सकते, दूसरे देशों में क्या हो रहा है नहीं देख सकते। महाभारत के युद्ध के समय संजय घर बैठे बैठे

युद्ध का हाल सुनाता रहा। कहते हैं यह सब दिव्य दृष्टि के कारण था। यह दिव्य दृष्टि का केन्द्र दुनिया के प्रत्येक मनुष्य में है। यह केन्द्र हमारी स्थूल आँखो के मूल में पीनियल ग्रंथि के अन्दर है। हम एक पल में कोलकाता पहुंच जाते हैं, कभी समुन्दर पर पहूंच जाते हैं, कभी अमेरिका कभी पाकिस्तान पहुचं जाते हैं। योग लगाते समय परमधाम, कभी सूक्ष्म वतन पहुंच जाते हैं यह सब हर व्यक्ति में स्थित दिव्य दृष्टि के कारण ही हो रहा है। अच्छा वा बुरा मन में जो हम देखते हैं, कल्पना करते हैं, यह सब दिव्य दृष्टि से हम देख रहे होते हैं और यह सच होता है। परंतु स्थूल आंखो से दिखता नहीं। उसका कारण यह है कि वह कोशिकायें जो कल्पना में की गई चीजों को देख सकती हैं कमजोर हो गई हैं। ये कमजोर कोशिकायें मेलाटोनिन हार्मोन से ठीक होती हैं। मेलाटोनिन हार्मोन अंधेरे में पैदा होता है और रात को १२ से ३ बजे के बीच पैदा होता है और गहरी नींद में पैदा होता है। प्रकृति ने ऐसी व्यवस्था बना रखी है सभी जीव जन्तु वा मनुष्य इस समय जरूर सोते हैं। यह मेलाटोनिन हार्मोन गहरे ध्यान अर्थात योग साधना में भी पैदा होता है। अगर रात में २ बजे योग लगायें और गहरे अंधरे में लगायें तो इस का भरपूर रिसाव होता है। संसार दिव्य दृष्टि के केन्द्र को जागृत करने की विधि खोज रहा है, राजयोगी भी मेहनत कर रहे हैं। इस विधि से इसे सहज ही जागृत कर सकते हैं। इस विधि को भी अपना सकते हैं। ऐसे नई नई खोज हमें करते रहना है तब हमारा और इस संसार का काया कल्प हो जायेगा।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**डॉक्टर** - कहिए कैसे आना हुआ...

**राजू** - डॉक्टर साहब लिवर में बहुत दर्द हो रहा है.

**डॉक्टर** - शराब पीते हो ? **राजू** - हां हां बिल्कुल पर छोटा पैक ही बनाना

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

❋ क्यू एस क्रमवारी २०२५ कोणते विद्यापीठ जगातील प्रथम क्रमांकाचे ठरले?

- टोरंटो

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

### वाढदिवस कसा साजरा करावा?

मिकीमाऊसचे रूप घेतलेली तीन-चार मुले संपूर्ण कार्यक्रमात फिरत होती. अनेक महिला विराजला घेण्यासाठी उत्सुक होत्या. एकीच्या कडेवरून दुसरीच्या कडेवर विराजला घेताना अनोळखी चेहरे बघून विराज जोरजोरात रडत होता. मिकी-माऊसला बघून त्याला गंमत वाटण्याऐवजी तो घाबरत होता. विराज सारखा त्याच्या आईकडे बघून केविलवाणा होत होता. सर्व मोठी मंडळी कार्यक्रमाचा आनंद घेत होती, परंतु विराजला वाढदिवस म्हणजे काय, हे समजत नव्हते. सध्या त्याचे विश्व फक्त त्याचे आई-बाबा, आजी-आजोबा व त्याच्या वयाच्या चिमुरड्यांइतकेच सीमित होते. परंतु सर्वांनी त्याचा विचार न करताच वाढदिवस मोठ्या स्वरूपात करण्याचे ठरविले होते. विराजसारख्या छोट्या मुलांचा अनुभव आपण अनेक वाढदिवसांमध्ये घेत असतो.

बाळ वर्षाचे झाल्यावर घरातील प्रत्येक सदस्यालाच त्याचा वाढदिवस साजरा करण्याबद्दल उत्सुकता असते. एक वर्षामध्ये बाळाला तोंडामध्ये खालचे दोन किंवा चार दात व वरील दोन दात आलेले असतात. काही मुले एक वर्षामध्येच अडखळत पाऊल टाकायला सुरुवात करतात, तर काही मुले चालायला सुद्धा लागतात. या वयातील मुले एक-दोन शब्द बोलायला शिकतात. त्याच्या अनेक लीलांनी आई-वडील, आजी-आजोबा आनंदी असतात व हा आनंद साजरा करण्यासाठी बाळाचा वाढदिवस अगदी साध्या पद्धतीने करावा.

वाढदिवस हा बाळाचा असतो, परंतु त्याचा आनंद बाळाशिवाय इतर नातेवाईकच घेताना दिसतात. आपले मित्र-मंडळी, नातेवाईक यांच्यामध्ये बाळाला रस नसतो. म्हणून आपल्या मुलाला ज्याच्यामध्ये आवड आहे त्या गोष्टी या दिवशी कराव्यात. त्याच्या छोट्या मित्रांना बोलावून तो आनंदी कसा राहिल, याकडे विशेष लक्ष द्यावे. वाढदिवसाच्या दिवशी केकवर मेणबत्त्या लावून त्या मुद्दाम विझवून वाढदिवस साजरा करण्याची पद्धत सगळीकडे आहे, परंतु मेणबत्त्या विझविणे हे अशुभ लक्षण आहे. व चुकीची प्रथा आहे.

मुलाचा वाढदिवस म्हणजे त्याच्या आयुष्यातील मंगल दिवस असतो. मग अशा मंगलमय क्षणी मेणबत्त्या कशासाठी विझवायच्या. उलट मेणबत्त्या किंवा दिवे घरात लावून घर प्रकाशमय करावे. वाढदिवसासाठी केक आणला जातो व तो केक सुरीने कापून त्याचे तुकडे करतात.

परंतु अन्न शस्त्राने कापणे हेसुद्धा अशुभ लक्षण आहे. या मंगल दिवशी केक कापायचा असेल, तर तो चमच्याने प्रत्येकाला द्यावा. प्रत्येकाने आपल्या धर्मानुसार वाढदिवस साजरा करावा. परंतु पाश्चात्त्य देशाचे अनुकरण करून मेणबत्त्या विझविणे, केक सुरीने कापणे या गोष्टी कटाक्षाने टाळाव्यात.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडूळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर

अहिल्यानगर

मोबाईल नं- ८७९३४००४००

# सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेला २ कोटी ९ लाख रुपयांचा नफा

### आर्थिक वर्षात उत्कृष्ट आर्थिक कामगिरीची परंपरा कायम

नगर – सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेने चांगल्या आर्थिक कामगिरीची परंपरा कायम राखत मागील आर्थिक वर्षात २ कोटी ९ लाख रुपयांचा नफा मिळवला आहे. ३१ मार्च २०२५ अखेर पतसंस्थेच्या ठेवी ८५ कोटीच्या झाल्या असून कर्ज वितरण ७० कोटी आहे. संस्थेकडे ७ कोटी ४१ लाखांचा स्वनिधी आहे. सभासद, ठेवीदारांचा विश्वास, संचालक मंडळाचे संस्थेला प्रगतीपथावर नेणारे धोरण, कर्मचार्यांचे योगदान यामुळे संस्थेने आर्थिक प्रगतीचा आलेख उंचावला आहे, अशी माहिती संस्थेचे चेअरमन समीर बोरा व व्हाईस चेअरमन अभय पितळे यांनी दिली. लवकरच मार्केट यार्ड शाखेचे नुतनीकरण करण्यात येणार आहे.

आजमितीस संस्थेच्या इतर बँकांमध्ये २५ कोटी १७ लाखांच्या मुदतठेवी आहेत. डिपॉझिट उपस्थितीने केलेल्या शिफारशीनुसार संस्थेने अहमदनगर मर्चंटस बँक, जिल्हा बँक, महानगर बँक, पूर्णवादी बँक, कॉसमॉस बँक, शरद बँक, कल्लाप्पा आवाडे बँक, लातुर अर्बन बँक एयु स्मॉल फायनान्स बँक, अंबिका महिला बँकेतील मुदतठेवींचे व्याजासह नूतनीकरण केले आहे. कर्ज वसुली, एनपीए व थकबाकीचे प्रमाण कमी करण्यात सर्व संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी यांना मोठे यश मिळाले आहे. संस्थेचे रौप्य महोत्सवी वर्ष सुरु झाला आहे. सदर वर्षेसभासदांसाठी संस्मरणीय ठरेल असे नियोजन असून यासाठी संस्थेने आपल्या नफ्यातून विशेष निधीची तरतूद करणार आहे.


समीर बोरा


अभय पितळे

पतसंस्थेने नेहमीच नाविन्यपूर्ण योजना राबवून ग्राहकांना सर्वोत्तम सेवा देण्याचा प्रयत्न केला आहे. जागतिक महिला दिनानिमित्त महिलांना ठेवींवर अतिरिक्त व्याज देणारी योजना राबविण्यात आली. त्याला मोठा प्रतिसाद मिळाला. याशिवाय सोनं खरेदीसाठी कर्ज ही अभिनव योजनाही ग्राहकांच्या पसंतीस उतरली आहे. पतसंस्थेकडून वेअर हाऊस कर्ज, सोने तारण कर्ज आदी कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. याशिवाय विविध शासकीय कर भरणा, आरटीजीएस, डिमांड ड्राफ्ट, संगणकीकृत कामकाज, एस एम एस सेवा, क्यु आर कोड अशा अत्याधुनिक सुविधाही उपलब्ध आहेत. संस्थेची स्वमालकीची सुसज्ञ अशी भव्य इमारत दिमाखात उभी असून भविष्यात जिल्ह्यात शाखा विस्तार करण्याचा संचालक मंडळाचा मानस आहे.

# बी. पी. हिवाळे शिक्षण संस्थेचा नवा लोगो आणि ब्रँडिंगचा शुभारंभ

नगर – बी. पी. हिवाळे एज्युकेशनल सोसायटीने नव्या युगाच्या प्रारंभाचा नवा लोगो, पर्पज स्टेटमेंट आणि टॅगलाइन कार्यक्रमात लाँच केला. या कार्यक्रमातून संस्थेच्या ब्रँडिंगचा नवा अध्याय सुरू झाला आहे.

आजचं युग हे ब्रँडिंग, मार्केटिंग आणि अॅडव्हान्स टेक्नॉलॉजीचं आहे. विद्यार्थ्यांच्या मनोवृत्तीचा अभ्यास करत, त्यांच्या गरजांवर आधारित ओळख निर्माण करण्यासाठी गेल्या चार महिन्यांपासून विविध स्टाफ बैठका, चर्चासत्रं आणि संकल्पनात्मक काम करण्यात आलं. त्यातून हा लोगो तयार झाला आहे, अशी माहिती संस्थेचे सेक्रेटरी विशाल बार्नबस यांनी दिली. अखंड ३० मिनिटे जुन्या ते नवीन लोगो चे प्रवास आणि पुढील काळातील ब्रँड म्हणून BPHES हेच ओळख कशी तयार होणार याची पार्श्वभूमी दाखविले.



बी. पी. हिवाळे एज्युकेशनल सोसायटीने नव्या युगाच्या प्रारंभाचा नवा लोगो, पर्पज स्टेटमेंट आणि टॅगलाइन कार्यक्रमात लाँच केला.

लोगो वापराची दिशा, स्टँडर्ड पॅटर्न आणि विविध संस्थांमध्ये एकसमानता राखण्याचं धोरण देखील स्पष्ट करण्यात आलं. यामधून संस्थेची ७८ वर्षांची प्रतिष्ठा, मूल्याधिष्ठित शिक्षण आणि भविष्यातील व्हिजन स्पष्टपणे अधोरेखित होत आहे. नवीन टॅगलाइन आणि पर्पज स्टेटमेंट संपूर्ण संस्थात्मक ओळख एकत्रित करत, एकता आणि उद्दिष्टसिद्धी यावर भर देतात.

हा कार्यक्रम बी. पी. हिवाळे संस्थेच्या २० जून १९४७ रोजी स्थापन झालेल्या अहमदनगर महाविद्यालयाच्या वर्धापन दिनाच्या औचित्याने घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. एन. एम. ऍस्टन (माजी प्राचार्य, वाडिया कॉलेज) होते. संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. जे. बार्नबस, डॉ. एस. बी. कोलते, संचालक मंडळ व सर्व शिक्षकवृंदांची उपस्थिति यामुळे कार्यक्रम आणखी विशेष ठरला.

हा नवा लोगो केवळ एका डिझाईनपुरता मर्यादित न राहता, संस्था आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याकडे जाणाऱ्या प्रवासाची दिशा दर्शवतो, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि रूल ऑफ लॉ विषयक लेखिका अॅड.गौरी लोखंडे यांचा राष्ट्रीय पातळीवर सन्मान

नगर – न्यायव्यवस्था आणि आधुनिक तंत्रज्ञान यातील गुंतागुंतीचा परस्पर संबंध अधोरेखित करणारा अॅड. गौरी विठ्ठल लोखंडे यांचा संशोधनात्मक लेख आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि रुल ऑफ लॉ ज्युरीसप्रुडेन्सीयल ऍनॅलिसिस या विषयावर प्रकाशित झाला. या लेखाचा समावेश जुडीशियल रिव्यू स्कोप लिमिटेशन अॅण्ड ओव्हररीच या इंग्रजी ग्रंथात करण्यात आला आहे. माईंड युवर लॉ या आंतरराष्ट्रीयस्तरावरील प्रकाशन संस्थेने या ग्रंथाचे प्रकाशन केले आहे.



या ग्रंथाची प्रस्तावना सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती जस्टीस हेमंत गुप्ता यांनी लिहिली असून संपादन विधिज्ञ एस. के. बॉस यांनी केले आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि कायदा यामधील तात्विक आणि व्यावहारिक पैलू अभ्यासून लिहिलेला अॅड.गौरी लोखंडे यांचा लेख हा केवळ शैक्षणिकदृष्ट्या नव्हे, तर न्यायिक प्रणालीसमोरील भविष्यातील आव्हाने अधोरेखित करणारा अभ्यासवजा दस्तऐवज ठरला आहे.

अॅड.गौरी लोखंडे यांनी आत्तापर्यंत विविध विद्यापीठांअंतर्गत झालेल्या आंतरराष्ट्रीय ऑनलाईन विधी परिषदा (इंटरनॅशनल लीगल कॉन्फरन्सेस) यामध्ये सहभाग घेतला असून त्यात त्यांनी पाच संशोधन निबंध सादर केले आहेत. कायदा आणि तंत्रज्ञान यांची सांगड घालणाऱ्या विषयांवर त्यांचा विशेष अभ्यास असून, नव्या युगातील डिजिटल न्यायव्यवस्थेतील संभाव्य बदल व त्यावर होणारे कायदेशीर परिणाम यांची त्यांनी चिकित्सक मांडणी केली आहे.

# अभिषेक चावला यांचा प्रकल्प अमेरिकातून प्रकशित

नगर – अभिषेक चावला यांच्या ह्युमन ॲक्टिविटी रेकग्नेशन इन व्हिडिओज यूजिंग डीप लर्निंग विथ इनफ्लेटेड ३ डी मॉडल प्रकल्पाला AiP Publishing (अमेरिकन इन्स्टिट्यूट ऑफ फिजिक्स) प्रकाशनने जगभरात प्रकाशित केले. एआयपी प्रकाशन हे संशोधन जर्नल्स, परिषदेच्या कामकाजाचा आणि सर्वत्र भौतिक शास्त्रज्ञांसाठी आवश्यक माहितीचा एक विश्वासार्ह स्त्रोत आहे. एआयपीची, मुख्यालय न्यूयॉर्क शहरात आहे. एआयपीमध्ये पाच सोसायट्यांचा समावेश आहे ज्यांचे एकत्रित सदस्यसंख्या ४ हजार आहे. अमेरिकन फिजिकल सोसायटी (एपीएस), ऑप्टिकल सोसायटी ऑफ अमेरिका (आता ऑप्टिका), अकॉस्टिकल सोसायटी ऑफ अमेरिका सोसायटी ऑफ रीओलॉजी, अमेरिकन असोसिएशन ऑफ फिजिक्स टीचर्स.



अभिषेक यांचे प्राथमिक शिक्षण आष्टी व दिल्ली आणि बी. पी. एच. ई. सोसायटी जूनियर कॉलेज अहिल्यानगर येथे झाले. कारुण्या यूनिवर्सिटी, कोयम्बतूर, तमिलनाडु येथे कंप्यूटर साइंसिस एंड इंजिनियरिंग (B. tech) प्रथम श्रेणीतुन डिग्री प्राप्त केली. माइक्रोसॉफ्ट, अज़ूर, साइबर सिक्युरिटी, गुगल, हॉन्गकॉन्ग युनिवर्सिटी सारख्या संस्थांमध्ये अनेक वर्कशॉप केले आहेत.

# बारावी बोर्ड, MHT-CET आणि JEE परीक्षेत 'गवांदे क्लासेस'चा गणितात उच्चांक

नगर – नुकत्याच जाहीर झालेल्या १२वी बोर्ड, MHT-CET आणि JEE परीक्षेत गवांदे क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी गणित विषयामध्ये यश मिळविले आहे. १२ वी बोर्ड परीक्षेत ७ विद्यार्थ्यांनी १०० पैकी ९० पेक्षा जास्त गुण मिळविले आहे. यामध्ये पवन इथापे ९५, यश खकाळ ९४, भक्ती चाफेकर ९४, अभिनंदन मुळे ९४, ईशांत क्षीरसागर ९३, विराज मोहळकर ९०, कृष्णा ढोकणे ९० तसेच क्लासेसच्या २० विद्यार्थ्यांनी १०० पैकी ८० पेक्षा जास्त गुण मिळविले आहे.


नुकत्याच जाहीर झालेल्या १२वी बोर्ड, MHT-CET आणि JEE परीक्षेत गवांदे क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी गणित विषयामध्ये यश मिळविले

MHT- CET म्हणजेच अभियांत्रिकेच्या प्रवेश परीक्षेत गवांदे क्लासेसच्या २५ विद्यार्थ्यांनी १०० पैकी ९० पेक्षा जास्त गुण मिळविले आहेत. यामध्ये तन्मय गोबरे ९७.९७, अभिनंदन मुळे ९७.६५, सुजल शेटे ९७.५८, भक्ती चाफेकर ९७.५२, मेघा शेरकर ९७.१३, वरद साळी ९५.८८, दिव्या शिंदे ९५.७२, अथर्व थोरात ९५.६४, स्नेहा परकाळे ९५.५१, मोईन सय्यद ९४.७५, स्नेहल रोकडे ९४.५३, राहुल राठोड ९२.६६, यश मागडे ९२.५८, यशराज खकाळ ९२.४३, निशांत काळे ९१.६१, पूर्वा कंदूर ९१.६१, ऋतुजा काळे ९१.५१, वैष्णवी बोरा ९१.०५, सुमित पवार ९१.०२, आदिती झावरे ९०.४३, श्रावणी काळे ९०.५२, मानसी लाटे ९०.०९, स्नेहल परांडे ९०.०९, अमन शेख ९०.०९ तसेच ५५ विद्यार्थ्यांनी ८० पेक्षा जास्त गुण मिळविले आहे. सदर बहुतांशी विद्यार्थ्यांचे इंजिनिअरिंगचे स्वप्न केवळ गणित विषयातील गुणामुळे साध्य होणार आहे.

JEE (Main) म्हणजेच केंद्र सरकारच्या प्रवेश परीक्षेत सुद्धा गवांदे क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे सदर परीक्षेत १२ विद्यार्थ्यांनी १०० पैकी ९० पेक्षा जास्त गुण मिळविले आहे. यामध्ये अभिषेक सोळुंके ९७.८९, साहिल कापसे ९६.७६, सुशांत महांडुळे ९६.३८, यश भोर ९५ ५८, वैष्णवी रुपनर ९४.४७, ईशान क्षीरसागर ९३.२६ अभिनंदन मुळे ९२.८९, पवन इथापे ९२.५३, सुमित वाणी ९१.५१, साहिल सय्यद ९१.७६, सुजल सासवडे ९०.८९, सात्विक वराळ ९०.६० तसेच ३४ विद्यार्थ्यांनी ८० पेक्षा जास्त गुण प्राप्त केले आहे विशेष बाब म्हणजे यावर्षी २७ विद्यार्थी JEE (Advance) म्हणजेच IIT च्या प्रवेश परीक्षेसाठी पात्र ठरले आहे.

# NEET, JEE आणि CET मध्ये जे.जे. सायन्स ॲकॅडमी विद्यार्थ्यांचे उत्तम यश

### रिया कुलंगे जिल्हा टॉपर, तर अभिजीत पाटील JEE मध्ये ९९.३७ परसेंटाइलसह झळकला

नगर – शहरातील जे.जे. सायन्स ॲकॅडमीने यंदाही आपली यशाची परंपरा कायम ठेवत NEET, JEE आणि CET परीक्षांमध्ये यश संपादन केले.

या वर्षी रिया कुलंगे या विद्यार्थिनीने NEET परीक्षेत ६१५ गुणांसह अखिल भारतीय ६२२ वा क्रमांक पटकावत जिल्ह्यात टॉपर होण्याचा मान मिळवला. ही यशाची घोडदौड केवळ NEET पर्यंत मर्यादित न राहता JEE परीक्षेत अभिजीत पाटील याने ९९.३७ टक्के गुणांसह भक्कम यश मिळवत संस्था आणि पालकांचे नाव उज्ज्वल केले आहे.


शहरातील जे.जे. सायन्स ॲकॅडमीने यंदाही आपली यशाची परंपरा कायम ठेवत NEET, JEE आणि CET परीक्षांमध्ये यश संपादन केले.

CET परीक्षेतही संस्थेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले असून, वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि फार्मसी क्षेत्रातील अनेक विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश निश्चित केले आहेत. ॲकॅडमी गेल्या अनेक वर्षांपासून गुणवत्तापूर्ण शिक्षण, अनुभवी शिक्षकवृंद, वैयक्तिक मार्गदर्शन, नियमित चाचण्या आणि समर्पित अभ्यासपद्धतीमुळे शहरातील विद्यार्थ्यांची पहिली पसंती ठरली आहे.

संस्थेचे संस्थापक आणि संचालक कृष्णकांत झा म्हणाले की, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, वेळेचे नियोजन आणि मानसिक तयारपण या गोष्टी आमच्या यशाचे गमक आहेत. यंदाचा निकाल हा आमच्या टीमवर्कचा आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीचा परिणाम आहे.

पालक वर्गातूनही संस्थेच्या कौशल्यपूर्ण प्रशिक्षणाची आणि मार्गदर्शनाची विशेष स्तुती केली जात आहे. जे.जे. सायन्स ॲकॅडमी ही NEET, JEE आणि CET साठी जिल्ह्यातील सर्वोत्तम क्लासेस असून, दरवर्षी शंभरावर विद्यार्थी राष्ट्रीय पातळीवर यश मिळवत आहेत.

# नाटा (NATA) प्रवेश परीक्षेसाठी मुदतवाढ

### प्रथम वर्ष बी आर्क. च्या प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना संधी

नगर – कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर नवी दिल्ली च्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५–२६ साठी घेण्यात येत असलेल्या नाटा प्रवेश परीक्षेची नाव नोंदणीसाठी ५ ऑगस्ट पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून ९ ऑगस्ट पर्यंत च्या प्रत्त्येक शुक्रवारी आणि शानिवारी ही प्रवेश परीक्षा घेतली जाईल.

बॅचलर ऑफ आर्किटेक्चर या पाच वर्षाच्या अभ्यासक्रमा ला प्रवेश घेण्यासाठी नाटा (NATA) ही प्रवेश परीक्षा किंवा जे ई ई पेपर २ देणे बंधनकारक असते. बहुतांशी विद्यार्थ्यांना सदरच्या परीक्षा संदर्भात वेळेत माहिती उपलब्ध न झाल्यामुळे आर्किटेक्चर प्रवेशाची संधी गमावल्याची परिस्थिती निर्माण होते. संबंधित प्रवेश परीक्षेसाठी आवश्यक असणारे मार्गदर्शन वर्ग हे रमेश फिरोदिया कॉलेज ऑफ आर्किटेक्चर मध्ये सुरू झाले असल्याची माहिती रमेश फिरोदिया कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, वाळूंजचे विश्वस्त सी ए रमेश फिरोदिया यांनी दिली आहे.

नाटा (NATA) प्रवेश परीक्षेसाठी पुढील काही गोष्टी प्रामुख्याने लक्षात घ्याव्यात. नाटा २०२४ प्रवेश परीक्षेत जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले ते यावर्षी प्रथम वर्ष बी आर्क.च्या प्रवेशास पात्र असतील., नाटा ची परीक्षा विद्यार्थी एका वर्षात ३ वेळा देऊ शकतात., सध्या ही प्रवेश परीक्षा सुरू असून ९ ऑगस्ट पर्यंत च्या प्रत्त्येक शुक्रवारी आणि शानिवारी घेतली जाईल., विद्यार्थी बारावी (१०+२) भौतिकशास्त्र, गणित या विषयासह उत्तीर्ण झालेला असावा किंवा डिप्लोमा (१०+३) गणित विषयासह उत्तीर्ण झालेला असावा. याविषयी अधिक माहितीसाठी https://www.nata.in/ या वेबसाईटला भेट द्या.

नाटा परीक्षेला बसू इच्छिणाऱ्या व आर्किटेक्चर क्षेत्रात करिअर घडवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'रमेश फिरोदिया एज्युकेशनल ट्रस्ट' मार्फत मोफत मार्गदर्शनाची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. इच्छुकानी प्रा. मनोज कापरे (९५१८३३८२०२) व भूषण भगुरकर (८६०५०५३०२५) यांच्याशी संपर्क साधावा. असे आवाहन संस्थेचे असल्याचे संस्थेचे सल्लागार विश्वस्त डॉ. शरद कोलते यांनी सांगितले.

# सामान्य नागरिकांवरील अन्याय-अत्याचाराविरुद्ध कार्यकर्त्यांनी लढा देऊन न्याय द्यावा : विवेक तवले

### अहिल्यानगरला आंतरराष्ट्रीय मानवाधिकार न्यायिक सुरक्षा परिषदेची बैठक

नगर – आजच्या सामाजिक परिस्थितीत कार्यकर्त्यांनी केवळ पद न भूषवता, जनतेसाठी प्रभावीपणे काम करण्याची गरज आहे. अन्यायाविरुद्ध आवाज उठवणं, गरजूंपर्यंत न्याय पोहोचवणं आणि युवकांना सामाजिक कार्यात सहभागी करून घेणं ही काळाची गरज आहे. संघटनेच्या माध्यमातून आपण जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी कटिबद्ध असायला हवं. मानवाधिकार रक्षण ही केवळ जबाबदारी नसून, ती एक सामाजिक व नैतिक बांधिलकी आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य दक्षिण अध्यक्ष विवेक तवले यांनी केले.


आंतरराष्ट्रीय मानवाधिकार न्यायिक सुरक्षा परिषदेची बैठक झाली (छाया – विजय मते)

अहिल्यानगर येथील आंतरराष्ट्रीय मानवाधिकार न्यायिक सुरक्षा परिषद शासकीय विश्रामगृह येथे पार पडली. यावेळी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. विवेक तवले, महाराष्ट्र राज्याचे पश्चिम अध्यक्ष रमेश माने यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करून काही सूचना केल्या.

या बैठकीत पदाधिकाऱ्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या आणि सामान्य जनतेची कामे प्रभावीपणे कशी सोडवावीत यावर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच, संघटनेच्या विस्तारासाठी अहिल्यानगर जिल्ह्यात कसे काम करावे यावरही चर्चा झाली.

परिषदेकडून भ्रष्टाचार आणि सामान्य नागरिकांवर होणारे अन्याय – अत्याचार दूर करून न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातात. याव्यतिरिक्त, आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना मदत करणे, वृक्षारोपण, रक्तदान आणि शालेय साहित्य वाटप यांसारखे विविध सामाजिक उपक्रमही राबवले जातात. आंतरराष्ट्रीय मानवाधिकार न्यायिक सुरक्षा परिषद सर्वसामान्य नागरिकांना वेगवेगळ्या पद्धतीने मदत करत असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष अमोल कोठारी यांनी दिली.

या कार्यक्रमाला अमोल कोठारी, जिल्हा महासचिव अनिल नगरकर, कार्याध्यक्ष संतोष चव्हाण, नगर तालुकाध्यक्ष राजू अनमोल, महेश कुन्हे, अन्सार शेख, गणेश तवले, मंगेश खेडकर, पप्पू पाचारणे, सुजित शेळके, राजेश शिंदे, नितीन माने, सुधीर तवले, गणेश शेलार, सतीश गायकवाड, गणेश बोरुडे, संतोष चव्हाण, भाऊसाहेब टीमकरे, राधेश्याम कोळगे, ऋषिकेश थोरात, रमजान सय्यद, रियाझ शेख, सतिश लोखंडे, राजू पठाण, संदिप तवले यांच्यासह जिल्ह्यातील अनेक पदाधिकारी उपस्थित होते.


माहेश्वरी समाजाचा स्नेह मिलन २०२५ कार्यक्रम उत्साहात झाला. यावेळी समाज बांधव, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# युवक-युवतींमध्ये असलेली ऊर्जा, कल्पकता आणि नेतृत्वगुण समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे

### उद्योजक अनिल राठी यांचे प्रतिपादन; माहेश्वरी समाजाचा स्नेहमिलन २०२५ कार्यक्रम उत्साहात

नगर – समाजातील युवकांनी पुढे येऊन नेतृत्वाची जबाबदारी घ्यावी, युवकांमध्ये असलेली ऊर्जा, कल्पकता आणि नेतृत्वगुण समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. आपण आपली मूल्ये, परंपरा आणि आधुनिक विचार यांचा समन्वय साधत नव्या पिढीसाठी योग्य दिशा दाखवली पाहिजे, असे प्रतिपादन कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते उद्योजक अनिल राठी यांनी केले.

माहेश्वरी युवा संगठनच्यावतीने स्नेहमिलन २०२५ हा कार्यक्रम समाजबांधवांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. युवकांसाठी प्रेरणादायी मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात महिलांनी रांगोळी, गीत गायन, सांस्कृतिक कार्यक्रम शिवमहिमाचे उत्साहाने सादरिकरण करुण सक्रिय सहभाग घेतला. विजेत्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

बालकांनी सादर केलेल्या देशभक्तीपर, पारंपरिक आणि सर्जनशील नृत्यांमुळे उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात भरभरून दाद दिली.

प्रकल्प प्रमुख विशाल झंवर, सुमित चांडक, पवन बंग, पियुष झंवर यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. सूत्रसंचालन वैष्णवी लड्ढा व मधुर बिहानी यांनी केले. या कार्यक्रमाला मुकुंद धुत, अतुल डागा, जितेंद्र बिहाणी, अॅड. महेश काबरा, कृष्णगोपाल चांडक, सुयोग झंवर, योगेश मालपाणी, मुरलीधर बिहाणी, अलका बलदवा, गिता गिल्डा, शोभा राठी, शोभा सोनी उपस्थित होते.

संघटनेचे अध्यक्ष शाम भुतडा, सचिव संकेत मानधने व कार्यकारिणी सदस्य विशाल झंवर, अमित खटोड, अभिनंदन कालाणी, अनिकेत बलदवा, भूषण काबरा, प्रणव बिहाणी, गोविंद दरक, गोविंदा जाखोटिया, गोविंदा काकाणी, कुणाल लोया, मधुर बिहाणी, मुकुंद जाखोटिया, पवन बंग, पवन बिहानी, पियुष झंवर, प्रतीक सारडा, ऋषिकेश बजाज, संग्राम सारडा, संकेत अट्टल, योगेश सोमानी, सुमित बिहानी, सुमित चांडक, वेदांत बजाज यांनी परिश्रम घेऊन कार्यक्रमाला यशस्वी केले.

हा स्नेहमिलन कार्यक्रम समाजातील सर्व वयोगटातील व्यक्तींना एकत्र आणणारा, कलागुणांना वाव देणारा आणि सामाजिक ऐक्य वाढवणारा असा संस्मरणीय सोहळा ठरला.


देवगिरी संस्थानची संत श्री जनार्दन महाराज पालखीचे भिंगार शहरात आगमन झाले.

# महाराष्ट्राची वारकरी संप्रदायाची महान परंपरा

**शामराव वाघस्कर यांचे प्रतिपादन; श्रीमंतयोगी प्रतिष्ठानच्यावतीने संत श्री जनार्दन स्वामी महाराज दिंडीचे स्वागत, भिंगार शहर विठुरायाच्या गजराने दुमदुमले**

नगर – वारकऱ्यांच्या सेवेतच खरा आनंद आहे. साधु संत येती घरा तोची दिवाळी दसरा वारकऱ्यांची सेवा करण्याचे भाग्य आम्हाला लाभले आहे. वाघस्कर गल्ली येथे दिंडीच्या स्वागताची पूर्वजांची परंपरा नवीन पिढीने देखील पुढे चालवली आहे. पांडुरंगाच्या ओढीने वारकरी ऊन, वारा, पाऊस कशाचीही तमा न बाळगता पंढरपूरच्या दिशेने जात आहेत. हे आपल्या महाराष्ट्राची वारकरी संप्रदायाची परंपरा खूप महान आहे, असे प्रतिपादन श्रीमंतयोगी प्रतिष्ठानचे संस्थापक शामराव वाघस्कर यांनी केले आहे.

देवगिरी संस्थानची संत श्री जनार्दन महाराज पालखीचे भिंगार शहरात आगमन झाले. भिंगार शहर विठू नामाचा गजराने भारावून गेले. डोईवर वृंदावन घेतलेल्या महिला वारकरी तसेच आजूबाजूला हरिनामाचा गजर करणारे वैष्णव यामुळे शहरात जणू भक्तिरसाचा मळा फुलून आला होता. वेशीतील मारुती मंदिराचे ग्राम प्रदक्षिणा करून वाघस्कर गल्लीत पालखीचे आगमन होताच महिलांनी पालखीचे औक्षण केले. पालखीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. दिंडीच्या स्वागतासाठी श्रीमंत योगी प्रतिष्ठानचे महिलांनी रांगोळ्या काढून आकर्षक फुलांची सजावट केली होती. तसेच पालखीतील वारकऱ्यांवर पुष्पवृष्टी करण्यात आली.

देवगिरी संस्थानचे संत श्री जनार्दन महाराज पालखीचे दिंडी प्रमुख मुरारी आनंदे महाराज यांचा सत्कार ॲड. साहेबराव चौधरी यांच्या हस्ते करण्यात आला. यាप्रसंगी कॅन्टोन्मेंट बोर्डचे माजी उपाध्यक्ष संभाजीराव भिंगारदिवे, शामराव वाघस्कर, काँग्रेसचे जिल्हा चिटणीस रिजवान शेख, दत्तात्रय वाघस्कर, अशोक भिंगारदिवे, मिलिंद कानडे, तीलोत्तमा करांडे, मीनाक्षी वाघस्कर, रेखा मोरे, जयश्री कानडे, शोभा वाघस्कर, त्रिवेणी करांडे, वर्षा लोंढे, तेजश्री भालसिंग, सौ.विटणकरताई, श्रीमती काटेताई, सौ. सगमताई, मीरा बोबडे, जयदत्त वाघस्कर, श्रीकांत भालसिंग, मयूर भोईटे, संदेश वाघस्कर, रोहन कानडे, ओंकार दळे, सुनील घारगे, सौरभ मोहिते, सुरज बोबडे, साकुरे पाटील, विकी खरे, बजरंग चत्तर, गणेश श्रीपाद, आकाश तोरडी, देवदत्त वाघस्कर, प्रणव वाघस्कर, अनुज कानडे, निखिल परदेशी, रोहित विधाटे, यश दिघे आदी उपस्थित होते. वारकऱ्यांच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

ॲड. साहेबराव चौधरी म्हणाले, सालाबादप्रमाणे वाघस्कर गल्ली येथे संत श्री जनार्दन स्वामी महाराज पालखीचे स्वागत करण्यात येते. दिंडीचे आगमन होताच भिंगार शहरात भक्तीमय वातावरण झाले आहे. या पांडुरंगाच्या सोहळ्यात सर्व जाती धर्मातील लोक सहभागी होत असतात. वाघस्कर परिवार हा वारकरी कुटुंबातील असल्याने मोठ्या भक्ती भावाने दिंडीचे स्वागत करण्यात येते.

# श्री संत जनार्दन स्वामी महाराज दिंडीचे भिंगार शहरामध्ये भक्तीभावाने स्वागत


श्री संत जनार्दन स्वामी महाराज दिंडीचे भिंगारमध्ये भक्तीभावाने स्वागत करण्यात आले.

नगर – पंढरीच्या वारीसाठी निघालेल्या श्री संत जनार्दन स्वामी महाराज (पालखी) पायीदिंडीचे भिंगारमध्ये आगमन होताच भिंगार राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने भक्तीमय वातावरणात जय हरी विठ्ठल.. श्री हरी विठ्ठलच्या गजरात स्वागत करण्यात आले. शहरासह उपनगरात दिंडीचे आगमन झाले असताना वारकरींमुळे वातावरण प्रफुल्लित व भक्तीमय बनले आहे. भिंगार शहराध्यक्ष संजय सपकाळ, सर्वेश सपकाळ, प्रांजली सपकाळ, रमेश वराडे, अभिजीत सपकाळ, संपतराव बेरड यांनी रथातील पादुका डोक्यावर घेऊन परिसरातून मिरवल्या. दिंडीतील वारकऱ्यांनी पुंडलीक वरदा हरी विठ्ठल... श्री ज्ञानदेव तुकारामचा जयघोष केला.

**पुंडलीक वरदा हरी विठ्ठल... श्री ज्ञानदेव तुकारामचा जयघोष**

पालखीतील पादुकांचे पूजन प्रा. माणिक विधाते, अमित खामकर, ईवान सपकाळ, अर्जुनराव बेरड, संपतराव बेरड, विलास तोडमल, सिंधुताई सपकाळ, संगीता सपकाळ, दिपाली सपकाळ यांच्या हस्ते करण्यात आले. दिंडीचे प्रमुख ह.भ.प. आनंदे महाराज मुरारी यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विशाल बेलपवार, जहीर सय्यद, मेजर दिलीप ठोकळ, संजय भिंगारदिवे, युवकचे शहराध्यक्ष शुभम भंडारी, दीपक लिपाने, बाळासाहेब बेरड, अनिकेत सपकाळ, मच्छिंद्र बेरड, सतीश सपकाळ, अशोक पराते, प्रशांत चोपडा, प्रवीण फिरोदिया, कोंडीराम वाघस्कर, सुयोग चंगेडिया, अभिजीत ढाकणे, अविनाश पोतदार, शेषराव पालवे, ओम सपकाळ, दशरथ मुंडे, योगेश करांडे, सिद्धू (तात्या) बेरड, विठ्ठल राहींज, योगेश करांडे, बाबासाहेब नागपुरे, अस्लम शेख, दिव्या सपकाळ, रतन मेहेत्रे आदी उपस्थित होते.

आनंदेवाडा श्रीक्षेत्र देवगिरी–दौलताबाद (जि. औरंगाबाद) येथून श्री संत जनार्दन स्वामी महाराज (पालखी) पायी दिंडी आषाढी वारीसाठी निघाली आहे. दिंडीचे भिंगारमध्ये भक्तीभावाने स्वागत करण्यात आले. नगर–करमाळा मार्गे ही दिंडी पंढरपूरला प्रस्थान करणार आहे.

प्रा. माणिक विधाते यांनी दरवर्षी राष्ट्रवादी व भिंगारकरांच्या वतीने सपकाळ परिवार दिंडीचे स्वागत करुन सेवा देत आहे. वारकऱ्यांची दरवर्षी केली जाणारी ही सेवा प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

संजय सपकाळ यांनी या दिंडीचे भिंगार शहरात दरवर्षी मोठ्या उत्साहात व भक्तीभावाने स्वागत करण्यात येत असल्याची माहिती दिली. यावेळी दिंडीतील वारकऱ्यांना सपकाळ परिवाराच्या वतीने अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.

# मुस्लिम समाजातील हुंडेकरी परिवाराकडून सायकल वारीचे नगर शहरात स्वागत

नगर – आषाढी एकादशीनिमित्त नाशिक ते पंढरपूरला निघालेल्या सायकल वारीचे शहरात हुंडेकरी परिवाराच्यावतीने स्वागत करण्यात आले. नाशिक सायकलिस्ट फाऊंडेशनच्यावतीने मागील तेरा वर्षापासून सायकल वारीचे आयोजन केले जात असून, दरवर्षी करिम हुंडेकरी या सायकल वारीचे स्वागत करुन हुंडेकरी लॉनमध्ये त्यांच्या जेवणाची, राहण्याची व अल्पोपहाराची व्यवस्था करत असतात. यामध्ये तीनशे ते चारशे सायकलिस्टचा सहभाग आहे.


नाशिक ते पंढरपूरला निघालेल्या सायकल वारीचे शहरात हुंडेकरी परिवाराच्यावतीने स्वागत करण्यात आले.

मुस्लिम समाजातील हाजी करीम हुंडेकरी यांनी नाशिकहून पंढरपूरला सायकलवर जाणाऱ्या वारकरींचे मनोभावे स्वागत करुन, दरवर्षी वारकरी माझ्या दारात येतो, मी नशीबवान आहे. १३ वर्षापूर्वी सुरु झालेल्या या उपक्रमाचे अनुभव सांगून, या सेवेत मोठे पुण्य असून, जाती–धर्मात भेद करण्यापेक्षा माणुसकी धर्म जपण्याचा संदेश त्यांनी दिला.

या सोहळ्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे दिनेश आहेर, सायकलिस्ट दिंडीचे अध्यक्ष श्री. काळे, पोलीस अधिकारी संजय बारकुंड आदी उपस्थित होते. नाशिक सायकलिस्ट फाऊंडेशनच्यावतीने हुंडेकरी यांचा सत्कार करण्यात आला.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे म्हणाले की, स्वत: टेनिस खेळाडू असल्याने आरोग्याप्रती जागरुक राहून सायकलिंग व रनिंग करत असतो. या सायकल वारीत देखील काही वेळ सहभागी होण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. पांडुरंगाच्या दर्शनाची ओढ लागल्याने वारकरी तहान, भूक, कुटुंब विसरून पायी वारीत सहभागी होत असतो. पांडुरंगाची ओढ त्याला खेचत असते. आरोग्याचा संदेश देऊन दरवर्षी निघत असलेली या सायकल वारीचा उपक्रम प्रेरणादायी असल्याचे स्पष्ट करुन, जिवंत माणसात पांडुरंग पाहून, त्यांची सेवा घडवावी! हा संदेश त्यांनी दिला.

५० सायकलपटूंच्या उपस्थितीमध्ये सुरु झालेल्या या दिंडीत तीनशे ते चारशे महिला–पुरुष सायकलपटू दरवर्षी सहभागी होत आहे. पर्यावरण संवर्धन व आरोग्याचा जागर करीत निघालेल्या या सायकल दिंडीचा पहिला मुक्काम हुंडेकरी लॉनमध्ये असतो. दरवर्षी हुंडेकरी लॉन त्यांच्या स्वागतासाठी खुले ठेवले जाते. या सोहळ्यासाठी लग्नाची तारीख देखील घेतली जात नाही, तर तो दिवस फक्त या वारकरींसाठी राखीव ठेवला जातो. यामध्ये सर्व सायकलपटू वारकरींच्या राहण्यापासून ते नाष्टा व जेवणाची उत्तम प्रकारे काळजी घेतली जाते.


मार्केटयार्ड येथे संत श्रेष्ठ श्री निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्याचे आगमन झाले असता विश्व हिंदू परिषदेतर्फे नाशिक ते पंढरपूर मोफत आरोग्य सेवेचा शुभारंभ करताना भाऊराव कुदळे.

# वारकऱ्यांची सेवा हीच खरी ईश्वर सेवा

**भाऊराव कुदळे यांचे प्रतिपादन; नाशिक ते पंढरपूर विश्व हिंदू परिषदेच्या मोफत आरोग्य सेवेचा शुभारंभ**

नगर – आरोग्य सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे. सालाबाद प्रमाणे विश्व हिंदू परिषदेतर्फे नाशिक ते पंढरपूर वारकऱ्यांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी सेवा दिली जाते. मोफत औषध उपचार देण्यात येतो. वारकऱ्यांनी सुखरूप पंढरपूरला पोहोचावे यासाठी गेल्या १४ वर्षापासून विश्व हिंदू परिषदेचा हा उपक्रम सुरू आहे, असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषदेचे गोरक्षणाचे क्षेत्राचे संयोजक भाऊराव कुदळे यांनी केले आहे.

मार्केटयार्ड येथे संत श्रेष्ठ श्री निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्याचे आगमन झाले आहे. विश्व हिंदू परिषदेतर्फे नाशिक ते पंढरपूर मोफत आरोग्य सेवेचा शुभारंभ विश्व हिंदू परिषदेचे क्षेत्राचे संयोजक भाऊराव कुदळे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी त्र्यंबकेश्वर ते पंढरपूर संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळामध्ये विश्व हिंदू परिषदेतर्फे नाशिक ते पंढरपूर आरोग्य सेवेचा शुभारंभ विश्व हिंदू परिषद गोरक्षण क्षेत्राचे संयोजक भाऊराव कुदळे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी विश्व हिंदू परिषदेचे विभाग मंत्री सुनील खिस्ती, जिल्हा मंत्री अनिल जोशी, सहमंत्री शरदराव नगरकर, गजेंद्र सोनवणे, डॉक्टर ज्ञानेश्वर कमोद, आशालता कुमावत, ब्राह्मणकर काका, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर, मुकुल गंधे, श्रीकांत नांदापूरकर, राजेंद्र चुंबळकर, वीरेंद्र शिंदे, शिवाजी बोरुडे, मनोहर राहणे, दुर्गा वहिनीच्या संयोजिका जयश्री पोटे, हिरा शहापुरे, निर्मला बोरुडे, हेमलाता कांबळे, अमृता कवडे, मंगला गौरीधर, अजिता एडके आदींसह काकासाहेब म्हस्के मेडिकल कॉलेजचे विद्यार्थी आरोग्य सेवा देण्यासाठी उपस्थित होते.

या आरोग्य सेवेसाठी २५ डॉक्टर्स, सिस्टर्स व स्वयंसेवक सहभागी झाले आहेत. या दिंडीमध्ये जखमी रुग्णांना उपचार केले जात आहेत. तसेच गरजू रुग्णांना सलाईन लावण्यात आले आहे. तसेच वृद्ध नागरिकांचे पायाची तेल लावून मालिश देखील करण्यात आली आहे.

# जिजाऊंनी शिवाजी महाराजांसारखा महान योद्धा आणि राष्ट्रनायक घडवला

**शफकत सय्यद यांचे प्रतिपादन; अहिल्यादेवी होळकर शाळेत जिजाऊ पुण्यतिथी निमित्त मख़दुम सोसायटी तर्फे मोफत वह्या वाटप**


अहिल्यादेवी होळकर शाळेत जिजाऊ पुण्यतिथी निमित्त मख़दुम सोसायटी तर्फे मोफत वह्या वाटप करण्यात आले.

नगर – जिजाऊ माँसाहेब म्हणजे प्रेरणा, शिक्षण आणि संस्कारांची मूर्ती त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांसारखा महान योद्धा आणि राष्ट्रनायक घडवला. त्यांच्या स्मृतीनिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करणे, ही खरोखरच स्तुत्य गोष्ट आहे, असे प्रतिपादन मुस्कान वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष शफकत सय्यद यांनी केले.

सर्जेपुरा येथील मनपाची अहिल्यादेवी होळकर प्राथमिक शाळा क्रमांक ११ व शहीद अब्दुल हमीद उर्दू प्राथमिक शाळा क्रमांक १३ मध्ये राजमाता जिजाऊ यांच्या पुण्यतिथी निमित्त विद्यार्थ्यांना मख़दुम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी व रहमत सुलतान फाउंडेशनच्या वतीने मोफत वह्या व पाटी वाटप करण्यात आले.

याप्रसंगी मुस्कान वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष शफकत सय्यद, जिवन फाऊंडेशनचे अध्यक्ष आरिफ सय्यद, राजाभैय्या, अन्नुभाई, शाळेचे जबीन इनामदार, समीना खान, भाऊसाहेब चिकने, शाईस्ता शेख आदी उपस्थित होते.

मुलांना वह्या व पाटी मिळाल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता.

या उपक्रमाला यशस्वी करण्यासाठी शफी हज उमरा टुर्स, राजकुमार गुरनानी, सुनील भंडारी, जीएसएम मोबाईल, मुबीन खान, डॉ. रेश्मा चेडे, युनूसभाई तांबटकर, सुनील तेलतुंबडे (रोझमॅन) आदी मंडळी पुढे सरसावले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आबीद दुलेखान यांनी केले. जबीन इनामदार यांनी आभार मानले.


कोहिनूर मॉलमध्ये एम.एम.वाय.टी.सी. ॲकॅडमीच्या सहकार्याने २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

# कोहिनूर मॉलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

नगर – कोहिनूर मॉलमध्ये एम.एम.वाय.टी.सी. ॲकॅडमीच्या सहकार्याने २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. श्री रामावतार मानधना चॅरिटेबल ट्रस्ट संचलित महावीर मल्लखांब आणि योगा ट्रेनिंग सेंटर गेल्या १५ वर्षापासून अहिल्यानगर शहरात योगासन मल्लखांब आणि एरियल सिल्कचे प्रशिक्षण देण्याचे कार्य या सेंटरमार्फत होत असून, आजपर्यंत अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय खेळाडू घडवण्याचे काम करत आहेत.

मॉलने सामाजिक व सांस्कृतिक जाणीव जपत योग दिनाचे औचित्य साधून नगरकरांसाठी हा उपक्रम आयोजित केला. यामध्ये योगासन, ध्यान आणि रिदमिक योगाचे सादरीकरण करण्यात आले, ज्यामुळे प्रेक्षक प्रभावित झाले. योग ही भारताची अमूल्य देणगी असून, आजच्या तणावपूर्ण जीवनशैलीत शरीर, मन आणि आत्म्याचा समतोल साधण्याचे कार्य करते. योगासने शरीराला बळकट आणि लवचिक ठेवतात, तर ध्यान व प्राणायाम मनाला स्थिरता व शांतता देतात आणि जीवन सकारात्मक बनते, असे मनोगत श्री रामावतार मानधना ट्रस्टचे संस्थापक मोहन मानधना यांनी व्यक्त केले.

प्रशिक्षक व संपूर्ण टीम यांचे व नगरकरांचे दिप्ती गुंदेचा यांनी आभार मानले. कार्यक्रमाला मोहन मानधना, उमेश झोटिंग, प्रणिता तरोटे, आप्पा लाढाने, अक्षय पावडे आदी उपस्थित होते.

# माऊंट लिटेरा झी स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन व वर्ल्ड म्युझिक डे उत्साहात साजरे


माऊंट लिटेरा झी स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन आणि वर्ल्ड म्युझिक डे उत्साहात साजरा करण्यात आला.

नगर – माऊंट लिटेरा झी स्कूल, अरणगाव, दौंड रोड, अहमदनगर येथे २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन आणि वर्ल्ड म्युझिक डे उत्साहात साजरे करण्यात आले.

निसर्गरम्य वातावरणात आणि शेकडो झाडांच्या सान्निध्यात विद्यार्थ्यांनी विविध योगासने सादर केली. सर्व वयोगटांतील विद्यार्थ्यांनी योगप्रात्यक्षिकांमध्ये सहभाग घेतला. योगाचा आरोग्यावर होणारा चांगला परिणाम, मानसिक शांती आणि दीर्घायुष्य याविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देण्यात आली.

वर्ल्ड म्युझिक डे देखील विद्यार्थ्यांनी आनंदात साजरा केला. गायन व वादन कार्यक्रमात सहभाग घेत विविध वाद्यांची प्रात्यक्षिके सादर केली. काही विद्यार्थ्यांनी वेगवेगळी गीते सादर करून कार्यक्रमात उत्साह व जोश निर्माण केला. त्यामुळे संपूर्ण शाळेत एक आनंदी, प्रेरणादायी व संगीतमय वातावरण तयार झाले.

विद्यार्थ्यांसह शिक्षकांनीही या कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेऊन सर्वांचा उत्साह वाढवला. प्राचार्या प्रा. शैलजा लोटके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत योग आणि संगीत यांचे जीवनातील महत्त्व पटवून दिले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे मणके विकारांपासून मुक्ती विभागाच्या नूतनीकरण दालनाच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी उद्योजक प्रेमराज बोथरा, संतोष बोथरा, सतीश बोथरा, मनीषा बोथरा, संगीता बोथरा, प्रतिभा बोथरा, तेजल पगारिया, डॉ. आशिष भंडारी आदी.

## आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे मणके विकारांपासून मुक्ती विभागाच्या नूतनीकरण दालनाचा लोकार्पण

नगर – आनंदऋषीजी हॉस्पिटल संचलित सूक्ष्म व्यायाम पद्धतीद्वारे मणके विकारांपासून मुक्ती विभागाचे अद्यावत व नूतनीकरण दालनाचे लोकार्पण आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सतीश रुणवाल व मंगला रूणवाल यांच्या हस्ते पार पडले. योगातील सूक्ष्म व्यायाम पद्धतीद्वारे मणके विकारापासून मुक्ती देणाचा निशुल्क उपक्रम मागील ८ वर्षापासून सुरु आहे. ब्लड बँक येथे कार्यरत असलेल्या या विभागाचे नूतनीकरण संथारा व्रतधारी श्रीमती पानाबाई लक्ष्मीचंद रुणवाल (बिजापूर, पुणे) यांच्या स्मृतीप्रित्यर्थ करण्यात आले आहे.

या सोहळ्याप्रसंगी याप्रसंगी उद्योजक प्रेम राज बोथरा, संतोष बोथरा, सतीश बोथरा, मनीषा बोथरा, संगीता बोथरा, प्रतिभा बोथरा, तेजल पगारिया, डॉ. आशिष भंडारी, प्रणेश बोथरा, रोहन बोथरा, रौनक बोथरा, विभाग प्रमुख प्रसाद जोशी, सायली जोशी, प्रा. महेश जोशी, प्रणेश्वर जोशी, प्रशिक्षिका प्रज्ञा दंडवते आदी उपस्थित होते.

मंगला रूणवाल म्हणाल्या की, मणके विकाराची व्याधी झपाट्याने वाढत असून, त्यासाठी योग आणि त्यातील सूक्ष्म व्यायाम पद्धती उपयोगी ठरत आहे. या केंद्राच्या माध्यमातून मणके विकारापासून त्रस्त असलेल्यांना आराम मिळाला आहे. या व्याधीमुक्तीच्या कार्यासाठी नेहमीच सहकार्य राहणार असून, सासू असलेल्या संथारा व्रतधारी श्रीमती पानाबाई रुणवाल यांच्या प्रेरणेने हा प्रकल्प उभारण्यात आला आहे.

मणक्यात गॅप पडणे, गादी सरकणे, कंबर दुखी, पाठ दुखी, मानेचे दुखणे, गुडघेदुखी इत्यादी विकारांचा त्रास रुग्णांना व्यायामाच्या साध्या सोप्या व तितकाच परिणामकारक पद्धतीने शिकवले जातात. रुग्णांना हमखास गुण येत असल्याची भावना येणारे रुग्ण प्रतिक्रिया देत आहेत. सतत मुंग्या येणे, पूर्ण पाय दुखणे, मान अवघडणे, हातापायाला बधीरता जाणवणे इत्यादी लक्षणावर व्यायाम पद्धतीचा लाभ परिणामकारक असल्याचे विभागाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

विभागाच्या अधिक माहितीसाठी प्रसाद जोशी ९९२१२७२३०६.

# हिंदू धर्मांतर व लव्ह जिहादविरोधात तातडीने कडक कायदा आणावा : आ. संग्राम जगताप

नगर – भारतामध्ये आजपर्यंत एकही मुस्लिमाचे हिंदू धर्मात बळजबरीने धर्मांतर झालेले नाही. पण भारतासह भारताबाहेरीलही हिंदू आज धर्मांतरामुळे असुरक्षित आहेत. त्यामुळे या धर्मांतर करणाऱ्या जिहादी वृत्तीच्या व पाद्रींच्या कामाला प्रखर विरोध होण्यासाठी केवळ मोर्चे काढून उपयोग नाही तर आपल्या भागात कोणत्याही हिंदूचे धर्मांतर होणार नाही यासाठी प्रत्येकाने जागरूकपणे लक्ष ठेवून काम करावे. राज्य सरकारने व केंद्र सरकारने तातडीने धर्मांतर विरोधात व लव्ह जिहाद विरोधात चांगला कडक कायदा आणावा. जेणेकरून कोणताच नि:ष्पाप हिंदू धर्मांतरास बळी पडणार नाही, अशी मागणी आ.संग्राम जगताप यांनी केली.



धर्मांतर विरोधी कायदा राज्यात व देशात लागू करा या मागणीसाठी अहिल्यानगर शहरात काढण्यात आलेल्या जनआक्रोश मोर्चात आ.संग्राम जगताप, आ. गोपीचंद पडळकर, पुण्याच्या हिंदुत्ववादी कार्यकर्त्या वर्षा डहाळे व आदिनाथ पालवे महाराज आदींसह हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी, महिला सहभागी झाले होते.

सांगली शहरातील विवाहित गर्भवती महिलेने सासरी ख्रिश्चन धर्म स्वीकारावा यासाठी झालेल्या छळामुळे आत्महत्या केली. या घटनेच्या निषेधार्थ व धर्मांतर विरोधी कायदा राज्यात व देशात लागू झाला पाहिजे या मागणीसाठी आमदार संग्राम जगताप यांच्या पुढाकारातून रविवारी सकाळी अहिल्यानगर शहरात जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून मार्केट यार्ड चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापर्यंत हा मोर्चा काढण्यात आला. यावेळी मार्केट यार्ड चौकात झालेल्या सभेस आ. संग्राम जगताप, आमदार गोपीचंद पडळकर, पुण्याच्या हिंदुत्ववादी कार्यकर्त्या वर्षा डहाळे व आदिनाथ पालवे महाराज आदींसह संघटनांचे

### जनआक्रोश मोर्चात नागरिक व महिलांचा सहभाग

पदाधिकारी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पदाधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, महिला व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी मोर्च्यात सहभागी झालेल्या महिलांनी पेटत्या मशाली व धर्मांतर विरोधी कायद्याची मागणी करणारे फलकही हातात घेतले होते.

आ.गोपीचंद पडळकर म्हणाले, राज्यात सर्वात जास्त हिंदूंचे धर्मांतर हे अहिल्यानगर जिल्ह्यात होत आहे. त्यामुळे सर्व हिंदू नागरिकांनी जागृत राहून या जिहादी व ख्रिश्चन पाद्रींना आपल्या भागातून हाकलून द्या. जिल्हाधिकाऱ्यांनी व प्रत्येक तालुक्यातील तहसीलदारांनी बेकायदेशीरपणे उभा राहिलेल्या मशिदी व चर्च त्यांची शहानिशा करून तातडीने त्याच्यावर बुलडोझर फिरवला पाहिजे. अनेक जण जातीने ख्रिश्चन आहेत पण शासकीय आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी ते कागदोपत्री एससी एसटी किंवा ओबीसी असल्याचे दाखवतात. शासकीय लाभ व नोकरी करत आहेत. अशा फसवणूक करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्या विरोधातही बडतर्फची कारवाई झाली पाहिजे. मी, आमदार संग्राम जगताप व मंत्री नितेश राणे यांनी हिंदू विरोधात होणाऱ्या कटकारस्थानांना जशास तसे उत्तर देण्याचे ठरवले आहे. जे संविधान मानत नाहीत, भारत माता की जय म्हणत नाहीत, राष्ट्रगीत म्हणत नाही अशांना भारताबाहेर काढण्यासाठी आमच्या प्रयत्न आहे. येणाऱ्या अधिवेशनामध्ये धर्मांतर विरोधी कायदा होण्यासाठी राज्यभर असे मोर्चे काढून सरकारकडे मागणी करण्यात येत आहे. तसेच ज्यांचे धर्मांतर मुस्लिम ख्रिश्चन धर्मात झाले आहे अशांनाही पुन्हा हिंदू धर्मात आणण्यासाठी कायदा करावा, अशी मागणी सरकारकडे करत आहोत.

वर्षा डहाळे यांनीही सभेत घडलेल्या विविध घटनाचे दाखले देत परखडपणे विचार व्यक्त करत धर्मांतर विरोधी कायद्याची मागणी केली. सभेचे सूत्रसंचालन दिनेश जोशी यांनी केले. चंद्रकांत काळोखे यांनी आभार मानले.

# जिजाऊ ब्रिगेड विभागीय बैठकीमध्ये हुंडाबळी रोखण्याचा संकल्प

नगर – अहिल्यानगर येथे जिजाऊ ब्रिगेड महाराष्ट्रच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त पश्चिम महाराष्ट्र आढावा बैठक पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी आंतरराष्ट्रीय कार्याध्यक्ष सुजाताताई ठुबे होत्या. यावेळी प्रदेशाध्यक्ष सीमा बोके, कार्याध्यक्ष राजश्री शितोळे, विभावरी ताकट, उपाध्यक्ष वर्षाताई माने, डॉ. अश्विनी देवकी, जिल्हाध्यक्ष ॲड. स्वातीताई जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

महिला सक्षमीकरण तसेच समाजातील अनिष्ट रुढी परंपरा चुकीच्या चालीरीती तसेच महिलांना दुय्यम स्थानी समजणाऱ्या प्रथा डावलून एक जुटीने पुढे जाण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. तसेच नुकत्याच हुंडा या अनिष्ट प्रकाराचा देखील परखड समाचार घेण्यात आला. पुण्यातील प्रकरणामुळे पुन्हा एकदा हुंडा प्रथेचे कठोर आत्मचिंतन करणे गरजेचे आहे, असे मत जिजाऊ ब्रिगेड प्रदेश अध्यक्ष सीमाताई बोके यांनी व्यक्त केले.



अहिल्यानगर येथे जिजाऊ ब्रिगेड महाराष्ट्रच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त पश्चिम महाराष्ट्र आढावा बैठक पार पडली.

अहिल्यानगर जिल्ह्यात जिजाऊ ब्रिगेड सक्षमपणे काम करत असल्याने जिल्हाध्यक्ष सौ.स्वातीताई जाधव यांच्या कार्याचा देखील विशेष गौरव या ठिकाणी करण्यात आला. सृष्टी फाउंडेशनच्या माध्यमातून गरीब विद्यार्थ्यांसाठी त्यांनी राबवलेल्या अभ्यासिका व मदतीची विशेष दखल घेऊन त्यांचे अभिनंदन देखील करण्यात आले व संघटनेच्या कार्याचा आढावा घेण्यात आला व संघटन बांधणीच्या दृष्टीने महत्वाचे निर्णय देखील घेण्यात आले. जिजाऊ ब्रिगेडचे संघटन ताकतीने उभे करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला प्रत्येक तालुक्यात संघटन उभे करून महिला अन्याय विरुद्ध जोरदार संघर्ष करण्याची आमची तयारी असून कोणत्याही जाती धर्माच्या महिलांवरील अन्याय अत्याचार विरुद्ध संघर्ष करण्यासाठी आम्ही तयार असून लवकरच प्रत्येक तालुक्यात पुनर्बांधणी करण्यात येईल असे जिल्हाध्यक्ष स्वाती जाधव यांनी जाहीर केले.

या बैठकीत हुंडा घ्यायचा नाही आणि द्यायचा नाही या सामाजिक संदेशावर सर्वांनी एकमुखाने शपथ घेतली. गेल्या वर्षभरात महिला सक्षमीकरणासाठी राबवण्यात आलेल्या विविध उपक्रमांची प्रभावी उजळणी करण्यात आली. ८ मार्च रोजी सृष्टी कम्प्युटर्सतर्फे मोफत कोर्स आयोजित केल्याचे कौतुक करण्यात आले. यासोबतच हळदी-कुंकू समारंभ, महिला सभा, तसेच संपूर्ण महाराष्ट्रभरात झालेल्या क्रांतिकारी उपक्रमांची माहिती देण्यात आली. आगामी वर्षात महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी नव्या योजना आणि उद्दिष्टे यावर भर देण्यात आला.

अहिल्यानगर जिल्ह्यात कोणत्याही महिलेला हुंड्यासाठी त्रास होत असेल किंवा महिलेवर अत्याचार होत असेल तर त्या महिलांनी जिजाऊ ब्रिगेड संपर्क करावा जिजाऊ ब्रिगेड त्यांच्या पाठीशी शेवटपर्यंत उभा राहील, असे ॲड.स्वाती जाधव म्हणाल्या.



नगरच्या ऐतिहासिक वस्तू संग्रहालयाचे माजी कार्यकारी विश्वस्त स्व.सुरेश जोशी यांच्या निवासस्थानी रसिक ग्रुपच्या वतीने लावण्यात आलेल्या निलफलकाचे अनावरण करताना आ.संग्राम जगताप व महानगरपालिकेचे आयिक्त यशवंत डांगे.

## स्व. सुरेश जोशी यांच्या निवासस्थानच्या नील फलकाचे अनावरण

नगर – थोर इतिहास संशोधक व नगरच्या ऐतिहासिक वस्तू संग्रहालयाचे माजी कार्यकारी विश्वस्त स्व.सुरेश जोशी यांच्या आगरकरमळा येथील निवासस्थानी रसिक ग्रुपच्या वतीने लावण्यात आलेल्या निलफलकाचे अनावरण आ.संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे होते. यावेळी रसिक ग्रुपचे अध्यक्ष जयंत येलूलकर, ऐतिहासिक वस्तू संग्रहालयाचे कार्यकारी विश्वस्त डॉ.रवींद्र साताळकर, चंद्रशेखर जोशी व महेश जोशी आदीं उपस्थित होते.

यावेळी इतिहास तज्ञ भूषण देशमुख, प्रा.नवनाथ व्हावळ, माजी नगराध्यक्ष प्रेमकुमार गिल्डा, साहित्येक सरोज आल्हाट व शब्बीर शेख, डॉ.महेश बुलाख, राजेंद्र टाक, ॲड.झरकर, बाळासाहेब देशमुख, शाम शिंदे आदींसह नागरिक उपस्थित होते. ऐतिहासिक वस्तू संग्रहालयाच्या जडणघडणीत योगदान देणारे नारायण आव्हाड यांचा रसिक ग्रुपच्यावतीने सत्कार करण्यात आला. शारदा होशिंग यांनी सूत्रसंचालन केले. स्नेहल उपाध्ये यांनी आभार मानले. पाहुण्यांचा सत्कार प्रशांत आंतेपोलू व प्रसन्ना एखे यांनी केला.

# केडगाव देवी परिसरात मनपातर्फे डेंग्यू मुक्त अहिल्यानगर अभियान

### वसाहतींच्या परिसरातील पाणी साठ्याची तपासणी, नागरिकांशी संवाद, जागतिक योग दिनानिमित्त एक पृथ्वी एक आरोग्यबाबत जनजागृती

नगर – महानगरपालिकेमार्फत सुरू करण्यात आलेल्या डेंग्यूमुक्त अहिल्यानगर अभियानात दुसऱ्या आठवड्यात केडगाव देवी परिसरात भेटी देऊन तपासणी करण्यात आली. परिसरातील वसाहतींमध्ये असलेले पाणीसाठे, टाक्या, हौद आदींची तपासणी करून त्यात बेट टाकण्यात आले. डेंग्यूच्या डासांची उत्पत्ती टाळण्यासाठी, प्रजनन साखळी तोडण्यासाठी आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी यावेळी केले.



केडगाव देवी परिसरात महानगरपालिकेतर्फे डेंग्यू मुक्त अहिल्यानगर अभियान राबविण्यात आले.

यावेळी यशवंत डांगे, महापालिकेच्या आरोग्य विभागाचे प्रमुख डॉ. सतीश राजूरकर, केडगाव आरोग्य केंद्राचे अधिकारी, कर्मचारी, नर्सेस, माजी नगरसेवक मनोज कोतकर, लता शेळके आदी उपस्थित होते. नागरी वसाहतीमध्ये पाण्याचे साठे तपासून त्यात औषध टाकण्यात आले. तसेच, पावसामुळे वसाहतीच्या परिसरातील टायर, इतर पडीक व टाकाऊ साहित्यांमध्ये साचलेले पाणी काढून स्वच्छ करण्यात आले.

या अभियानावेळी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त एक पृथ्वी एक आरोग्य याबाबत जनजागृती करून योगा प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. यशवंत डांगे यांनी आरोग्य विषयक उपाययोजना, नागरिकांनी घ्यावयाची याबाबत माहिती दिली. तसेच, आरोग्यासाठी योगा किती आवश्यक आहे, याचे महत्त्व पटवून दिले. नागरिकांनी उत्तम आरोग्यासाठी नियमित योगासने करावीत, असेही यशवंत डांगे यांनी सांगितले.

डेंग्यू मुक्त अहिल्यानगरसाठी नागिरकांनी स्वतःहून अभियानात सहभाग घ्यावा. स्वतःच्या घराची तपासणी करावी. त्यात घरातील स्वच्छ पाणी साठविलेला हौद, बॅरल, छतावरील पाण्याची टाकी, अडगळीत पडलेले साहित्य व त्यात पावसाचे पाणी साठले आहे का याची तपासणी करावी. घरातील कूलर, तसेच जुन्या पध्दतीच्या फ्रिजमधील ट्रे तपासावा. त्यात डासाच्या अळ्या आहेत का, हे तपासावे. असल्यास ते रिकामे करावे. आपण स्वतःहून सहभाग घेऊन केलेल्या कामाचा, उपाययोजनेचा व्हिडिओ, फोटो महानगरपालिकेत सादर करावा. जे नागरिक सातत्याने स्वतःच्या घरापासून स्वतः सुरवात करतील व इतरांना करण्यासाठी प्रवृत्त करतील, त्यांचा मनपामार्फत सन्मान करण्यात येईल, असेही यशवंत डांगे यांनी म्हटले आहे.

दरम्यान, हे अभियान २० आठवडे – ५ महिने राबविण्यात येणार आहे. पुढील आठवड्यात २८ जून रोजी सकाळी ८ वाजता डेंग्यू मुक्त मोहिमेच्या तिसऱ्या आठवड्याचे अभियान तोफखाना प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत कोंडी मामा मंदिर, कोठला या परिसरात पार पडणार आहे. स्थानिक नागरिकांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन यशवंत डांगे यांनी केले आहे.

# अहिल्यानगर सहाय्यक कामगार आयुक्त, बालकल्याण समिती आणि अमृतवाहिनी, ग्रामविकास मंडळाच्या प्रयत्नामुळे १५ बालमजुरांची सुटका

नगर – सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय अहिल्यानगर यांना बालकल्याण समिती अहिल्यानगर यांच्याकडुन प्राप्त झालेल्या पत्रानुसार शासनाने गठित केलेल्या कृतीदलामार्फत २० जून रोजी बाल कामगार यांची मुक्तता करण्याकामी धाडसत्र आयोजित करण्यात आले होते. या मोहिमेत १५ बालम जुरांची सुटका करण्यात आली.

थोडक्यात हकिगत अशी की, एमआयडीसी पोलिसांच्या पथकाने १२ जून रोजी सनफार्मा कंपनीसमोर २ अल्पवयीन बालकांना ताब्यात घेवून बालकल्याण समिती यांच्यासमोर हजर केले. यावेळी समितीच्या अध्यक्ष व सदस्यांनी समुपदेशन करुन बालकांशी चर्चा केली असता असे निदर्शनास आले की, सदर बालके यांना तांड्यावर मालकाकडे मजुरी करत असताना जबर मारहाण झाली त्यामुळे ते पायी चालत नगर, एमआयडीसी परिसरात आले. असे सांगुन त्यांचे अजुन साधारण १५ साथीदार हे बालमजुर म्हणुन संबंधित मालकाकडे अनेक दिवसांपासुन काम करत आहेत. हे बालमजूर संबंधित ठिकाणी शेळी पालन, गुरे चारणे, धुणी-भांडी करणे, लहान मुलांना सांभाळणे आणि पाय चेपुन घेणे अशी कामे करतात. तसेच तांड्यावरील मालकांच्या कर्नाटक येथील कोळसाखाणीमध्ये सर्व बालकांचे पालकांना कोळसा पाडणेकामी कामावर ठेवण्यात आलेले असुन, ते काम सोडुन जाऊ नये म्हणून या सर्व बालकांना जणू ओलिस ठेवलेले आहे.



अहिल्यानगर सहाय्यक कामगार आयुक्त व बालकल्याण समिती आणि अमृतवाहिनी, ग्रामविकास मंडळ यांच्या प्रयत्नामुळे १५ बालमजुरांची सुटका करण्यात आली.

ही बाब समजताच बालकल्याण समितीने सहाय्यक कामगार आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलिस अधिक्षक यांना सदर माहिती कळवली. त्यानंतर सहाय्यक बालकामगार आयुक्त यांनी शासनाने गठीत केलेल्या कृतीदलामार्फत २० जुन रोजी पहाटे ५ वाजता धाडसत्राचे आयोजन केले. त्यानुसार २० जुनला सकाळी ७.१५ मि. सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयाचे संदीप हरमळकर, ललीत दाभाळे, उदयकुमार सुर्यवंशी, सौरभ हामंद, बालकल्याण समितीच्या सदस्या ॲड. अनुराधा येवले, अमृतवाहिणी ग्रामविकास मंडळ संस्थेचे दिलीप गुंजाळ, सिराज शेख, मंगेश थोरात, संध्या कुलकर्णी, मयुरी वनवे, म.न.पा.चे वतीने आशिष हंस, पोलिस अधिक्षक कार्यालयाच्या वतीने सफौ. अजय बेरड, जालिंदर माने, अशोक लिपने, रमाकांत गावडे, म.पो.का. ज्योती शिंदे, चाईल्ड लाईनचे राहुल वैराळ हे कारवाईमध्ये सहभागी होऊन यांनी सेवालाल तांडा, गहुखेल ता.आष्टी, जि.बीड येथे सतर्कतेने धाडसत्र पूर्ण करुन १५ बालमजुरांची सुटका केली. सदर बालकांच्या पुनर्वसनासाठी, काळजी व संरक्षणाच्या दृष्टीने पुढील कार्यवाहीसाठी सर्व बालके बालकल्याण समिती अध्यक्ष व सदस्य बीड यांच्यासमोर हजर केले. त्याचबरोबर सहाय्यक कामगार आयुक्त अहिल्यानगर रेवणनाथ ढिसले यांनी सहाय्यक कामगार आयुक्त बीड यांच्याशी त्वरित पत्र व्यवहार करून सदर धाडसत्राबाबत माहिती दिली

सदरच्या कार्यवाहीमध्ये सहाय्यक कामगार आयुक्त, पोलिस अधीक्षक, बालकल्याण समिती अध्यक्ष सदस्य, अमृतवाहिनी ग्राम विकास मंडळ संस्था यांचे सहकार्य लाभले.

## धनादेश न वटल्याप्रकरणी १७,००,००० रुपये दंड, एक महिना कैदचा आदेश

नगर – अहमदनगर येथील अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी मंदार पांडे यांनी आरोपी मे. सुजल ट्रेडर्सचे भागिदार महेश गुप्ता व मिना महेश गुप्ता यांना दोघांना रक्म रुपये १७,००,००० रुपये दंड व दंड न भरल्यास १ महिना साधी कैद अशी शिक्षा न्यायालयाने सुनावली.

अहमदनगर येथील सुजल ट्रेडर्स या फर्मने नगर अर्बन को. ऑप बँक या बँकेकडुन कर्ज घेतले होते. सदर कर्जाच्या परतफेडीपोटी भागिदार या नात्याने आरोपी नामे महेश गुप्ता व मिता महेश गुप्ता यांनी रक्कम रुपये १५,००,००० चा चेक दिलेला होता सदर चेक न वटता परत आल्यामुळे सन २०१९ मध्ये सदर आरोपी विरुध्द अर्बन बँकेने फौजदारी केस दाखल केलेली होती. सदर केसमध्ये गुणदोषावर चौकशी होवून आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत झाल्यामुळे, आरोपीस वरीलप्रमाणे कोर्टाने शिक्षा सुनावली आहे.

सदर केसमध्ये फिर्यादीच्या वतीने ॲड. प्रदिप एम. भंडारी, ॲड. रोहित भंडारी यांनी काम पाहीले त्यांना ॲड. मनिषा मळेगावकर यांनी सहकार्य केले.

